cmyk

## संपादकीय

### संधीसाधुंची लाजीरवाणी धडपड !

कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य करणारे मंत्री कुंवर विजय शहा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करा, असे आदेश मध्य प्रदेश हायकोर्टाने दिले आहेत. मध्य प्रदेश हायकोर्टाने स्वत:हून कुरेशी यांच्यावर केलेल्या विधानाची दखल घेतली व मंत्री शहा यांच्या विरोधात लवकरात लवकर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. मध्य प्रदेश हायकोर्टाचे न्या. अतुल श्रीधरन यांच्या अध्यक्षतेखाली खंडपीठाने पोलिस महासंचालकांना मंत्र्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२३ | शनिवार, दि.१७ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## अमेरिकेतील एनआरआयना झटका!

नवी दिल्ली/वॉशिंग्टन:अमेरिकेत राहणाऱ्या अनिवासी भारतीयांसाठी एक वाईट बातमी आहे. अमेरिकेतील एका प्रस्तावित नवीन करांमुळे या अनिवासी भारतीयांचा खर्च वाढणार आहे. रिपब्लिकन पक्षने पाठिंबा दिलेल्या या मसुदा विधेयकाचे नाव बीग ब्युटीफूल बील असे आहे. त्याद्वारे अमेरिकेतून पाठवल्या जाणाऱ्या पैशांच्या व्यवहारांवर ५ टक्के कर लावण्याचा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. म्हणजे, जर एक लाख रूपये भारतात पाठवले तर त्यावर ५००० रूपये अतिरिक्त कर भरावा लागू शकतो. हे विधेयक मंजूर झाले, तर ते ४ जुलै २०२५ पासून लागू होण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे भारतात पैसे पाठवताना अतिरिक्त शुल्क भरावे लागणार आहे. विशेष म्हणजे यातून कुटुंबीयांचा खर्च, शिक्षण, वैद्यकीय गरजा किंवा गुंतवणूक अशा कोणत्याही कारणांसाठी सूट दिलेली नाही.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना २० कोटींची मदत

## त्या–त्या विभागातील आयुक्तांकडे निधी केला वितरीत

**पुणे । प्रतिनिधी**

**नापिकी कर्जबाजारीपणा आणि कर्ज परतफेडीच्या तगाद्यामुळे शेतकरी आत्महत्या प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीसाठी २० कोटी रुपयांची तरतूद राज्य सरकारने केली आहे. या तरतुदीची रक्कम विभागीय आयुक्तांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय राज्य सरकारने शुक्रवारी (दि.१६) प्रसिद्ध केला आहे. यामध्ये मागील वर्षीची शेतकरी आत्महत्येची आकडेवारी विचारधीन ठेवून रक्कम वितरित केली आहे.**

यामध्ये कोकण विभागासाठी १२ लाख रुपये वितरित करण्यात येणार आहेत. तर अमरावती विभागात ६ कोटी ७६ लाख रुपये, छत्रपती संभाजीनगर विभागात ४ कोटी ९२ लाख रुपये, नागपूर विभागात ३ कोटी ७५ लाख रुपये, नाशिक विभागात ३ कोटी ३९ लाख आणि पुणे विभागात १ कोटी ६ लाख रुपये वाटप करण्यात येणार आहेत. राज्यात शेतकरी आत्महत्याचा प्रश्न गंभीर आहे. सततची नापिकी कर्जबाजारीपणा आणि कर्ज परतफेडीच्या तगाद्याने शेतकरी जीवनयात्रा संपवत आहेत. विदर्भ आणि मराठवाड्यात मागील वर्षभरात २०२२ मध्ये १ हजार २३, २०२३ मध्ये १ हजार ८८ आणि २०२४ मध्ये ८२२ शेतकऱ्यांनी जीवन संपवले आहे. ही रक्कम मुंबई आणि मुंबई महानगर वगळता उर्वरित जिल्हाधिकाऱ्यांना वाटप करण्यासाठी विभागीय आयुक्तांकडे वितरित केली आहे. दरम्यान, मागील वर्षीची अनुदान रक्कम रखडून पडल्याची प्रकरण समोर आली होती.



## थोडक्यात...

### भारताचा कच्च्या तेलाच्या आयातीचा विक्रम

नवी दिल्ली–भारताने मार्च २०२५ मध्ये दररोज ५४ लाख बॅरल कच्च्या तेलाची आयात करून नवीन विक्रम केला आहे. २०२५ आणि २०२६ मध्ये भारतातील कच्च्या तेलाची मागणी सर्वात वेगाने वाढण्याची अपेक्षा असून ही मागणी चीनच्या मागणीच्या दुप्पट असेल, असे ओपेकने म्हटले आहे. वाढत्या ऊर्जेच्या गरजांमुळे ही मागणी वाढत आहे. मागणीतील ही वाढ २०२५ मध्ये चीनच्या तेलमागणीतील १.५ टक्के आणि २०२६ मध्ये १.२५ टक्के वाढीच्या अंदाजापेक्षा जास्त आहे.

### पाकिस्तानवर १५ ब्रह्मोसने हल्ला

नवी दिल्ली–ऑपरेशन सिंदुर दरम्यान पाकिस्तानवर भारताने १५ ब्रह्मोसने हल्ला केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या ब्रह्मोस हल्ल्यामुळे पाकिस्तानचे एअरबेस बेचिराख झाले होते. भारताच्या डमी विमानांनी पाकिस्तानला चकवल्याचीही माहिती मिळत आहे.

### रामराजे नाईक निंबाळकर यांची चौकशी

मुंबई–ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या बदनामी आणि खंडणी चौकशी प्रकरणात वडूज पोलिस माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांच्या निवासस्थानी चौकशीसाठी दाखल झाले. जयकुमार गोरे यांच्यावर आरोप करणाऱ्या महिले सोबत रामराजे यांचे मोबाईलवर संभाषण झाल्याचे उघड झाले होते. याप्रकरणी निंबाळकर यांची चौकशी करण्यात आली.

### भूमी अभिलेख कर्मचारी संघटना विभागाचा संप

मुंबई–महाराष्ट्र राज्य भूमी अभिलेख कर्मचारी संघटना विभागाने विविध मागण्यांसाठी पुकारला बेमुदत संप पुकारला आहे. कर्मचारी भरती तात्काळ करणे, खाजगीकरण बंद करणे, कर्मचाऱ्यांना संरक्षण देणे, तांत्रिक वेतन श्रेणी कर्मचाऱ्यांवरती होणाऱ्या कारवाया, अशा विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र भूमी अभिलेख कर्मचारी संघटना पुणे विभाग यांनी बेमुद संप पुकारला आहे.

### तुर्कीवरील सफरचंदाचा बहिष्कार तुर्कीला महागात पडला

नवी दिल्ली–जवळपास १००० कोटी रुपयांचा तुर्कीला व्यापाराचा फटका बसला असून पुण्यातील मार्केटमधून तुर्कीचे सफरचंद व्यापाऱ्याकडून विक्री करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. कुठल्याही परिस्थितीत तुर्कीचे सफरचंद मागवले जाणार नाहीत आणि विक्री केले जाणार नाहीत व्यापाऱ्यांचा निर्धार केला आहे.

### आता पोलीस हवालदारालाही तपास करण्याचे अधिकार

मुंबई–राज्यातील वाढते गुन्हे व पोलिसांचे अपुरे संख्याबळामुळे पोलीस यंत्रणेवरचा ताण वाढल्याने राज्य सरकारच्या गृह विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. हवालदार पदवीधर, ७ वर्षे सेवा आणि नाशिक येथील ६ आठवड्याचा प्रशिक्षण पूर्ण केलेल्यांनाच तपासाचा अधिकार मिळणार आहे.

# सुसाट सुटलेल्या कंटेनरची आठ वाहनांना धडक

## अपघातात महिला ठार तर २५ जण जखमी, कंटेनर पलटी होताच लावली आग

**केज/अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**बीड कडून भरधाव वेगात निघालेल्या एका कंटेनरने सात ते आठ वाहनाना धडक देऊन चिरडल्याची व यात एक महि तर २० ते २५ जण जखमी झाल्याची दुर्देवी घटना आज दुपारी केज मध्ये घडली असून घटनास्थळाहून फरार झालेला कंट पुढे लोखंडी सावरगाव नजिक पलटी झाला आहे.**

आज दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बीड कडून भरधाव वेगात नेकनूर मार्गे केज मध्? आलेल्या डीडी ०१– झेड ९७ ७१ क्रमांकाच्या कंटेनर ने सर्वप्रथम नेकनूर येथे काही जणांना चिरडले व त्यानंतर केज मधील अनिल पासून पुढे सात ते आठ वाहनांना चिरडत व पुढे काही वाहनांना फरपटत नेऊन सदर कंटेनर आंबेजोगाईच्या दिशेने फरार झाला प्राथमिक माहितीनुसार यामध्ये एक महिला ठार तर २० ते २५ जण जखमी झाले असून यातील आठ ते दहा गंभजखमीला आंबेजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात हलवण्यात आल्याचे वृत्त असून आज केज शहरात आठवडी बाजा असल्याने रस्त्यावर तोबा गर्दी असताना या दुर्घटनेत मोठा अनर्थ टळला आहे. सदर कंटेनर अनेक वाहनांना धडक देऊन अंबाजोगाईकडे येत असताना वाटेत त्याने चंदन सावरगाव नजिक आणख वाहन चालकास चिरडले असून या दुर्घटनेची माहिती मिळताच ◀◀ पान २ वर





## साडेचार महिन्यांत ७५ वाघांचा मृत्यू

**चंद्रपूर । वृतसंस्था**

**वाघांच्या संरक्षणासाठी उपाययोजना राबविल्या जात असताना अवघ्या साडेचार महिन्यांत ७५ व्याघ्रमृत्यूची नोंद झाली आहे. यातही १२ एप्रिल ते १३ मेदरम्यान १६ वाघ देशाने गमावले. यातील आठ घटना मध्य प्रदेशात तर पाच महाराष्ट्रात घडल्या आहेत.**

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या ताज्या आकडेवारीनुसार देशात जानेवारी ते १३ मे या चार महिन्यांत वन्यजीवांच्या झुंजीत, अपघातात, शिकार वा नैसर्गिकरित्या अशा विविध कारणांनी पंचाहत्तर वाघांचे मृत्यू झाले. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात सर्वाधिक २३ मृत्यूची नोंद झाली. चालू वर्षात देशात झालेल्या व्याघ्रमृत्यूंपैकी महाराष्ट्र व मध्य प्रदेश या दोन राज्यांत मिळून आतापर्यंत ६१ टक्के मृत्यू झाले आहेत. वाघांच्या वाढत्या मृत्यूने वन्यजीवप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे.

# डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट

## आईचा आशीर्वाद आणि महाराष्ट्राच्या नेतृत्वासमोर आरोग्यसेवेचा केला संकल्प

**मुंबई । प्रतिनिधी**

**आयुष्यमान भारत–मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी आपल्या कुटुंबासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत राबवण्यात येणाऱ्या विविध योजने संदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. तसेच या योजनेचा लाभ महाराष्ट्रामध्ये शेवटच्या घटकापर्यंत कसा पोहोचवता येईल या संदर्भामध्ये चर्चा झाल्याचे समजते.**

यावेळी डॉक्टर शेटे यांनी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष या नात्याने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासमोर 'मिशन संजीवनी' या महत्त्वाकांक्षी संकल्पनेविषयी सविस्तर चर्चा केली. हृदय, यकृत आणि बोन मॅरो ◀◀ पान २ वर



# विद्यार्थ्यांचे अपहरण करून बेदम मारहाण

## चौघांविरोधात गुन्हा दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**बीडमध्ये कायद्याचा धाक राहिला नाही असंच म्हणण्याची वेळ सामान्य नागरिकांवर आली आहे. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे प्रकरण राज्यात नव्हे तर देशात गाजले असताना पुन्हां एकदा असाच धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बीड वरून एसटी प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्याचे अपहरण करून अमानुष मारहाण करण्यात आली आहे. ही धक्कादायक घटना अंबाजोगाई शहरात घडली असून मारहाण करणार्या चार आरोपी विरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तीन आरोपींना पोलिसांनी च्या मदतीने ताब्यात घेतले तर अन्य एक जण फरार आहे.**

बीडवरुन अंबाजोगाईला जाणाऱ्या बसमध्ये थुंकल्याच्या कारणावरुन एका महिलेशी वाद झाला.यानंतर ही बस अंबाजोगाई शहरात पोहचताच चारजणांनी बसमध्ये घुसत विद्यार्थ्यासह त्याच्या मित्राला मारहाण ◀◀ पान २ वर





# परळीत गावठी पिस्टल बाळगणाऱ्या दोघांना बेड्या

## संभाजीनगर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल



परळी । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसापासून परळी शहरांमधील गुन्हेगारी कमी होण्याचं नाव घेत नाही. परळी पोलिसांनी रेल्वे स्टेशन परिसरामध्ये गावठी कट्टा बाळगणाऱ्या दोघांना मुद्देमालासह पकडले असून याप्रकरणी विक्री करणारे दोघे आणि खरेदी करणारे दोघे असे चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ◀◀ पान २ वर

# भुसंपादनाच्या एकाच प्रकरणात दुहेरी लाभ

## तिप्पटवाडी येथील प्रकार, दोषी अधिकाऱ्यांना नेमकं वाचवतंय कोण?–अजय सरवदे

**बीड । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील तिप्पटवाडी येथील गाव तलाव क्र मध्ये संबंधितांना भूसंपादन कायदा १८९४ नुसार दिनांक ३० जानेवारी २०१४ रोजी निधी वाटप केला होता. त्यानंतर भूसंपादन कायदा २०१३ लागू झाला त्यामध्ये कलम २३ व ३० नुसार भूसंपादन कायदा १८९४ नुसार वाटप केलेली रक्कम वजा करत २०१३ च्या नवीन कायद्यानुसार निवडा केला अन्? निधी मागणीसाठी उपजिल्हाधिकारी(रोहयो) यांचेमार्फत शासनाकडे पाठविण्यात आला. शासनाने या अगोदर भूसंपादन कायदा १८९४ नुसार निधी वितरित केला असल्याने २०१३ नवीन कायद्यामध्ये सदर प्रकरण बसत नाही त्यामुळे निधी मागणी प्रस्ताव नाकारन्यात आला.**

शासनाने निधी मागणी प्रस्ताव फेटाळल्यानंतर प्रकरणी कार्यकारी अभियंता, ल.पा.जि.प. बीड यांच्याकडे निधी मागणी सादर करून शासनाची फसवणूक श्री. निलेश बागडे क.ली. ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ मे २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६१.५० क्विंटल | २,४७५ | २,८२९ | २,६४० |
| ज्वारी/हायब्रिड: ७८.५० क्विंटल | १,७०० | २,६०० | २,२६४ |
| मका/लोकल:२८.०० क्विंटल | २,१५१ | २,१८१ | २,१६६ |
| तूर : ९.५० क्विंटल | ६,२५१ | ६,७१२ | ६,५२१ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ९०.५० क्विंटल | १,९०० | २,७३१ | २,३६० |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ७३.०० क्विंटल | ४,०५० | ४,३०० | ४,२०७ |
| हरभरा: ३६.०० क्विंटल | ५,३७१ | ६,७११ | ५,७०२ |

# बीडमध्ये जालना रोडलगत होणार सुसज्ज सहकार संकुल

## पालकमंत्री अजित पवारांकडून हिरवा कंदिल, आ.विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नाला यश

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सहकार विभागाचा भुखंड मागील अनेक वर्षापासुन बांधकामाच्या प्रतिक्षेत आहे. या भुखंडावर सहकार विभागातील सर्व कार्यालयांसाठी एकत्रित प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करुन बीड शहराच्या वैभवात भर घालील अशी आकर्षक व देखणी वास्तु उभारावी अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. ना. अजितदादा पवार यांनी सहकार संकुलाच्या बांधकामास हिरवा कंदिल दाखविला असुन प्रशासनाला या बाबतचे आदेश दिले आहेत. इमारत बांधकामाचा आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य वास्तु शास्त्रज्ञाकडुन तयार करण्याचे निर्देश प्रशासनाला मिळाले आहेत. पालकमंत्री म्हणुन बीड जिल्ह्यासाठी सहकार संकुलाची प्रशासकीय इमारत ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातुन आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातुन मिळणार आहे.**





बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सर्व्हे नंबर १७९९ मध्ये सहकार आयुक्त यांच्या नावाने १५१५.९४ चौरस मिटर आकारमानाचा भुखंड आहे. या शासकीय भुखंडावर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाच्या इमारतीचे बांधकाम प्रस्तावित होते. शहरातील काही व्यापाऱ्यांनी खाजगी प्रयोजनासाठी या जागेची मागणी शासनाकडे केली होती. आ. विजयसिंह पंडित यांनी या जागेवर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाचे बांधकाम व्हावे यासाठी पाठपुरावा व प्रयत्न केले. ना. अजितदादा पवार यांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर पाडेल अशी आकर्षक वास्तु निर्माण करण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी ना. अजितदादा पवार यांना साकडे घातले. आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला त्यांनी हिरवा कंदिल दाखवत सहकार संकुलाच्या बांधकामास मान्यता दिली आहे. जिल्हा उपनिबंधक, सहाय्यक निबंधक, देखरेख संघ यासह सहकार विभागातील ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# संधीसाधुंची लाजीरवाणी धडपड !

कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य करणारे मंत्री कुंवर विजय शहा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करा, असे आदेश मध्य प्रदेश हायकोर्टाने दिले आहेत. मध्य प्रदेश हायकोर्टाने स्वत:हून कुरेशी यांच्यावर केलेल्या विधानाची दखल घेतली व मंत्री शहा यांच्या विरोधात लवकरात लवकर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. मध्य प्रदेश हायकोर्टाचे न्या. अतुल श्रीधरन यांच्या अध्यक्षतेखाली खंडपीठाने पोलिस महासंचालकांना मंत्र्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. तसेच असे कृत्य पुन्हा केल्यास त्यांना न्यायालयाच्या अवमान कारवाईचा सामना करावा लागेल, असे बजावले.

पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने आक्रमक भूमिका घेत 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. 'ऑपरेशन सिंदूर'ची माहिती देण्याची जबाबदारी केंद्र सरकारने कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावर सोपवली होती. त्यामुळे 'ऑपरेशन सिंदूर'चा भाग असलेल्या कर्नल सोफिया कुरेशी यांची देशभर प्रशंसा झाली, अजूनही होत आहे. मात्र, त्याच कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान करून मध्य प्रदेशच्या भाजप सरकारमधील कॅबिनेट मंत्री कुंवर विजय शहा वादात सापडले. इंदूर जिल्ह्यातील रायकुंडा गावात आयोजित हलमा कार्यक्रमात कॅबिनेट मंत्री विजय शहा म्हणाले, ज्यांनी आमच्या महिलांच्या कुंकावर घाला घातला, ज्यांनी आमच्या पर्यटकांना मारले, आम्ही त्यांच्याच बहिणीला त्यांच्याकडे पाठवले आणि त्यांना ठार मारले. दहशतवाद्यांनी आमच्या हिंदूंना कपडे काढून मारले आणि मोदींनी त्यांच्या बहिणीला आमच्या विमानातून त्यांच्या घरी पाठवून त्यांना वाईट वागणूक दिली तर इशारा दिला की, जर तुम्ही आमच्या बहिणींना विधवा केले, तर तुमच्या समुदायाची बहीण येऊन तुम्हाला धडा शिकवेल. विजय शहा यांच्या या विधानाचा संबंध थेट लष्करी अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी यांच्याशी आहे. शहा यांच्या याच वक्तव्याची दखल घेत उच्च न्यायालयाने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. या शिवाय थोडीशी संवेदनशीलता दाखवा असे सर्वोच्च न्यायालयाने यावर म्हटले आहे. सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी मंत्र्यांकडून अशी विधाने अपेक्षित नसून, ती असंवेदनशील असल्याचे म्हटले आहे. संवैधानिक पदांवर असलेल्या व्यक्तींनी भाषण करताना संयम राखणे आवश्यक आहे.

भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारा धडक कारवाई करून पाकिस्तानचे कंबरडे मोडले खरे परंतु प्रसिद्धीची हाव असणाऱ्या व्यक्तींनी या संधीचा लाभ उठवण्याचा अश्लाघ्य, लाजीरवाणा प्रकार केला. तापलेल्या तव्यावर पोळी भाजून घेण्यासाठी संधिसाधू मागे राहतील कसे? काही चित्रपटनिर्मात्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' या शीर्षकासाठी नोंदणी केली. वृत्तवाहिन्यांनी पाकिस्तानचे नामोनिशाण मिटवण्यासंबंधीच्या बातम्यांचा रतीब टाकला. भाजपने याच मोहिमेला केंद्रित करून दहा दिवसांची तिरंगा यात्रा सुरू केली. शस्त्रसंधी नको असलेल्यांनी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांना व त्यांच्या कुटुंबियांना अर्वाच्च भाषेत ट्रोल केले, धमक्या दिल्या. मंत्री विजय शहा यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावर निशाणा साधला. प्रसिद्धीलोलुप व्यक्तींच्या या निर्लज्जपणाला काय म्हणावे?

# जालना तहसीलच्या कर्मचाऱ्याला लाचेच्या चक्रात पकडले

**जालना । प्रतिनिधी**

**तक्रारदार यांनी तहसील कार्यालय जालना येथे शेत जमीन संदर्भात प्रलंबित फेरफार बाबत दाखल केलेल्या आक्षेप दाव्याचा निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लावुन देण्यासाठी यातील आरोपी राजेंद्र श्रीपतराव शिंदे वय ४१ वर्ष सहाय्यक महसूल अधिकारी तहसील कार्यालय जालना यांनी तक्रारदार यांना स्वतःसाठी व तहसिलदार मॅडम यांच्यासाठी ५०,००००/-रु. थी मागणी केली.**

राजेंद्र शिंदे राहणार मातोश्री कॉलनी पाण्याच्या टाकीजवळ इंदेवाडी जालना . सदरील घटना दि.१५.०५.२०२५ रोजी १६.०० ते १७.२४ वा. च्या दरम्यान महसूल विभागाचे कक्षामध्ये तहसिल कार्यालय जालना येथे घडली. तक्रारदार यांनी तहसीलदार तथा दंडाधिकारी यांच्या न्यायालयात शेत जमीन संदर्भात यापूर्वी घेण्यात आलेल्या प्रलंबित फेरफार बाबत आक्षेप दाखल केला होता. सदर जमीन वर्ग २ ची असून तीचे वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्यासाठी प्रतिवादी यांनी अर्ज केलेला असून तक्रारदार यांनी सदर प्रकरणी आक्षेप दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याचा निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लावुन देण्यासाठी यातील आरोपी राजेंद्र शिंदे यांनी तक्रारदार यांना स्वतःसाठी व तहसिलदार मॅडम यांच्यासाठी ५०००००/-रु. ची मागणी केली परंतु, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचेकडे तक्रार केली. सदर तक्रारीवरुन लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी राजेंद्र शिंदे यांनी तक्रारदार यांनी तहसीलदार तथा दंडाधिकारी जालना यांच्या न्यायालयात शेत जमीन संदर्भात यापुर्वी घेण्यात आलेल्या प्रलंबित फेरफार बायत आक्षेप दाखल केला होता. सदर जमीन वर्ग २ ची असून तीचे वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्यासाठी प्रतियादी यांनी अर्ज केलेला असून तक्रारदार यांनी सदर प्रकरणी आक्षेप दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याचा निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लावुन देण्यासाठी स्वतःसाठी व तहसिलदार मॅडम यांच्यासाठी पैशाची मागणी केल्याचे निष्पण्ण झाल्याने दि.१५.०५.२०२५ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, पोलिसांनी आलोसे यास ताब्यात घेऊन अंगझडती घेतली असता रोख रक्कम ७८५/- रुपये व शाउमी कंपनीचा मोबाईल फोन मिळून आला आहे. राजेंद्र शिंदे यांचेविरुध्द पोलीस ठाणे तालुका जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला मा. न्यायालयात ०३ दिवसाचे पोलीस कोठडी रिमांड सह हजर केले असता मा. न्यायालयाने यांना दि.१९.०५.२०२५ ३ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजूर केला आहे.

# दहावीच्या परिक्षेत अजिंक्य यशवंत शेजुळचे दैदिप्यमान यश

**परतुर । प्रतिनिधी**

इयत्ता दहावीच्या परिक्षेत ९५.२०% गुण प्राप्त करून दैदिप्यमान यश संपादन केले आहे. अजिंक्य यशवंत शेजुळ परतुर योगानंद माध्यमिक विद्यालय परतुर येथील विद्यार्थी आहे. अजिंक्य यशवंत शेजुळ त्यीच्या यशाचे श्रेय हे तेच्या वडिलांना व आई व योगानंद माध्यमिक विद्यालय परतुर येथील शिक्षकांना दिले आहे अजिंक्य यशवंत शेजुळ यांना मराठी :९६



इंग्रजी ९४ गणितः ८० विज्ञान आणि तंत्रज्ञानः ९२सामाजिक शास्त्रेः ९७ टक्केवारीः ९५२०% मिळविली आहे. या यशाबद्दल परतुर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष श्यामसुंदर चितोडा , राष्ट्रवादी पार्टीचे तालुका अध्यक्ष जगताप सर ,वकील महासंघाचे अध्यक्ष महेंद्र कुमार वेडेकर , सनी गायकवाड, व परतुर प्रभाकर जी प्रधान , हनुमंत दवडे, माणिक जैस्वाल,अशोक जी ठोके, गणेश लालझरे, इमरान कुरेशी, राज भदर्गे, पवन रोशन कर ,इंद्रजीत हिवाळे जयपाल भालके, यांच्यासह अनेक मान्यवरांनी कौतुक केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## महात्मा फुले स्मारक समिती तर्फे छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी

# छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्यापूढे शत्रूही नतमस्तक झाले-डॉ.किरण चक्रे

### इतिहासातील प्रकांड पंडित, अपराजित, महापराक्रमी राजे म्हणजे छत्रपती संभाजी महाराज–डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**ज्यांच्या पराक्रमाने स्वराज्याची धुरा छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर तेवढ्याच प्रेरणेने आणि ताकदीने चालविली गेली अशा पराक्रमी, तेजस्वी, स्वराज्याच्या धाकल्या धन्याने केवळ नऊ वर्षांत आठ शत्रूंबरोबर एकही लढाई हरली नाही असे पराक्रमी राजे म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होते असे वक्तव्य प्रा.डॉ.किरण चक्रे यांनी केले.**

महात्मा फुले स्मारक समिती तर्फे आयोजित छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त ते प्रमुख व्याख्याते म्हणून स्मारक स्थळी आयोजित अभिवादन सभेत बोलत होते. यावेळी विचारमंचावर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले हे होते. पुढे बोलताना डॉ.चक्रे यांनी शिवपूर्वकालीन, शिवकालीन आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्यानंतर घडलेल्या इतिहासाची सांगड घालत संपूर्ण घडामोडी उपस्थित शिवप्रेमी, शंभूराजे प्रेमी नागरिकांना उलगडून दाखवत प्रबोधन केले. अध्यक्षीय समारोपात बोलतांना डॉ.राजेश इंगोले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी जीवन आदर्शवत कसं जगायचं ते शिकवलं. तर, छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी मरायचं कसं हे उदाहरण जगासमोर ठेवलं. अवघ्या नऊ वर्षांच्या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराजांनी जेवढे युद्ध लढले तेव्हढेच युद्ध लढून सर्व लढाया जिंकणारा अपराजित योद्धा म्हणजे



छत्रपती संभाजी महाराज होते. इतिहासातील सर्वात शापित राजे म्हणून छत्रपती संभाजी महाराज यांचे नांव येईल. कारण, तत्कालीन इतिहासकारांनी संभाजीराजांच्या कारकिर्दीला बदनाम करण्याचेच चुकीचे काम केले. परंतु, ज्यावेळी छत्रपती संभाजी महाराजांच्या खऱ्या इतिहासाचा आधुनिक इतिहासकारांनी शोध घेतला त्यावेळी छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीला तोड नाही असे सर्वांना मान्य करावे लागले असे डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. छत्रपती संभाजी महाराजांचा जन्ममहोत्सव महात्मा फुले स्मारक समितीच्या वतीने ढगेज क्लासेस मध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आदित्य कदम यांनी केले. तर व्याख्याते म्हणून डॉ.किरण चक्रे यांनी विचार मांडले. अध्यक्षीय समारोप अत्यंत प्रभावी व अभ्यासू पद्धतीने डॉ.राजेश इंगोले यांनी केला. तर आभार सुनिल नरसिंगे यांनी मानले. या प्रसंगी संजय साळवे, डॉ.अनिल नरसिंगे, रत्नदीप गोरे, डॉ.मिलींद ढगे, प्रा.आदित्य कदम, भाऊराव गवळी, बि.के.मसने व परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# माजलगावमध्ये रविवारी तिरंगा रॅलीचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**हम सेना के साथ है राष्ट्र प्रेमासाठी एकत्र येऊया!भारतीय सैन्याचे मनोबल वाढवण्यासाठी माजलगाव शहरात दिनांक १८ मे रविवार रोजी सकाळी १०:०० वाजता छत्रपती संभाजी महाराज चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक,भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे झेंडा चौक पर्यंत भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली आहे.या भव्य तिरंगा रॅलीमध्ये राष्ट्र प्रेमी व भारतीय सैन्यांचे मनोबल वाढवण्यासाठी सर्व माजलगाव तालुक्यातील देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत आपल्या सशस्त्र दलांनी पाकिस्तानातील दहशतवादी अड्डा नष्ट करून टाकले आहेत.भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्व कामगिरीच्या सन्मानार्थ देशभर भव्य तिरंगा यात्रा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्याचाच एक भाग म्हणून माजलगाव शहरात दि १८ मे रविवार रोजी सकाळी १०:०० वाजता शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते झेंडा चौकापर्यंत हि भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.तरी माजलगाव तालुक्यातील सर्व देश भक्तांनी या भव्य तिरंगा रॅलीस उपस्थित रहाण्याचे आहवान आयोजकांनी केले आहे.

# सेंद्रिय,नैसर्गिक शेतीसाठी जयप्रभा ग्रामीण विकास मंडळाचा पुढाकार

### शेतकऱ्यांना बैठकीतून मार्गदर्शन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**डॉ.पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती व नैसर्गिक शेती मिशनच्या वतीने वरपगाव (ता.केज, जि.बीड) येथील डॉ.पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती गटातील सभासदांसाठी कृषी विभाग यांच्या वतीने सेंद्रिय शेती करण्यासाठी मिळणाऱ्या अनुदानातून बॅलर खरेदी करण्यासाठी बैठक आयोजीत करण्यात आली होती.**

या बैठकीस प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ.आबासाहेब देशमुख हे तर यावेळी डॉ.पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती गटाचे अध्यक्ष डॉ.टि.एल.देशमुख, जयप्रभा ग्रामीण विकास मंडळाचे सचिव शिवाजीराव खोगरे, तालुका कृषी कार्यालय केज येथील आत्मा गटाचे प्रमुख पाटील साहेब, कृषी सहाय्यक सौ.लेमकर मॅडम, पोखरा विभागाचे प्रमुख राऊत साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तालुका कृषी कार्यालय, आत्मा विभागाच्या वतीने वरपगाव (ता.केज, जि.बीड) येथील डॉ.पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती व नैसर्गिक शेती मिशनच्या सेंद्रिय शेती गटातील शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानातून सप्त धान्यची स्लरी, दशपर्णी अर्क, डिकंपोजर, जिवाणू किटकनाशक, जिवाणू बुरशीनाशक, जिवाणू आदी सेंद्रिय घटक शेतकऱ्यांनी स्वतः तयार करून शेतात वापरण्यासाठी मिळणाऱ्या अनुदानातून बॅलर खरेदी करायचे ठरले. या प्रसंगी वरपगाव येथील डॉ.पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती गटाचे सचिव शिवाजीराव खोगरे यांनी सेंद्रिय कर्ब वाढवण्यासाठी विविध प्रकारच्या खतांबद्दल माहिती दिली. त्याच बरोबर १० ड्रम सेंद्रिय थिअरी शेती, नैसर्गिक शेती, गांडुळ खत, शेतकऱ्यांच्या बांधावरची प्रयोगशाळा यामधील आलगी शेवाळ, सिलीकॉन, निमकरंज ऑईल व ट्रायकोडर्मा यांच्या वापराबद्दल व सुक्ष्म घटकांबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर शेतीतील माती परिक्षण करणे का



आवश्यक आहे. या बद्दल ही माहिती सांगीतली. या प्रसंगी पोखराचे प्रमुख श्री.राऊत यांनी कृषी विभागाच्या विविध योजना सांगितल्या, तर कृषी साहय्यक सौ.लेमकर मॅडम यांनी बियांची उगवण शक्ती कशी तपासावयाची याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. तर आत्मा विभागाचे पाटील यांनी डॉ.पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती व नैसर्गिक शेती मिशन गटाबद्दल महिती दिली. तसेच यावेळी प्राचार्य डॉ.आबासाहेब देशमुख यांनी विविध विषयांना अनुषंगून शेतीतील त्यांचे अनुभव सांगितले. आणि डॉ.पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती मिशन गट वरपगावचे अध्यक्ष डॉ.टि.एल.देशमुख यांनी सेंद्रिय शेती बद्दल व शेतातील उत्पादन वाढीबद्दल मार्गदर्शन करून अध्यक्षीय समारोप केला. शेवटी सर्व शेतकऱ्यांनी अनुदानातून सेंद्रिय शेती करण्यासाठी बॅलर खरेदी करण्याचे ठरवले. शेवटी शिवाजीराव खोगरे यांनी बैठक संपल्याचे जाहीर करून उपस्थित सर्व शेतकरी बांधव आणि प्रमुख पाहुण्यांचे आभार मानले.

## पान १ वरून...

### सुसाट सुटलेल्या कंटेनरची

युसुफ वडगाव पोलीस स्टेशनच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी रोडवर येऊन सदर कंटेनरचा पाठलाग सुरू केला असता हा कंटेनर लोखंडी सावरगाव येथे पलटी झाला असून केज पान पाठलाग केलेल्या संतप्त जमावाने नंतर हा कंटेनर पेटवून दिल्याची माहिती आहे.

--------------

### विद्यार्थ्यांचे अपहरण

करण्यास सुरुवात केली. यावेळी वाहक व चालकाने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचे न ऐकता या चौघांनी या दोघांना खाली उतरवत मारहाण सुरुच ठेवली... या मारहाणीत संदेश सावंत हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर एसआरटी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान त्याचा मित्र राहुल केंद्रे याच्या फिर्यादीवरुन अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात ऋषी शिंदे, लखन जगदाळे, निकेश जगदाळे, बालाजी जगदाळे या चौघांविरोधात कलम १०९,१०४(१),११५(२),३५२, ३५१(२),३५१(३),३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.. दरम्यान उपचार घेतल्यानंतर संदेश सावंत याने आपल्याला अंबाजोगाई शहरात वेगवेगळ्या ठिकाणी घेऊन जात जबर मारहाण केल्याचे म्हटले आहे.. दरम्यान अंबाजोगाई शहर पोलिसांनी या प्रकरणातील तिघांना अटक केली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत तर एक आरोपी फरार आहे..

--------------

### डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी घेतली

ट्रान्सप्लांटसारखे अत्यंत खर्चिक पण जीवनावश्यक उपचार महाराष्ट्रातील सामान्य व गरजू नागरिकांना मोफत उपलब्ध करून देण्याच्या या सामाजिक आणि मानवी मूल्यांशी जोडलेल्या प्रयत्नाबाबत मुख्यमंत्री महोदयांनी सखोल संवाद साधला. त्यांचा सकारात्मक प्रतिसाद आणि दूरदृष्टीपूर्ण पाठींबा या उपक्रमाला लवकरच प्रत्यक्षात आणण्याचा विश्वास अधिक मजबूत करून गेला, असल्याचे डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी म्हटले आहे. त्यावेळी त्यांच्यासोबत आई, पत्नी आणि मुलं होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत जवळचे विश्वासू म्हणून ओमप्रकाश शेटे यांच्याकडे पाहिले जाते. मुख्यमंत्र्यांबरोबर झालेल्या चर्चेनंतर आयुष्यमान भारत मिशन योजने अंतर्गत गरजू रुग्णांना जास्तीत जास्त लाभ कसा मिळवून देता येईल यासंदर्भामध्ये डॉ. शेटे प्रामुख्याने लक्ष देणार असल्याचे म्हटले जात आहे.

--------------

### भुसंपादनाच्या एकाच

यांनी केली अन्? निधी मंजूर करून आणला त्यानंतर उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकर, अव्वल कारकून श्रीनिवास मुळे, कनिष्ठ लिपिक निलेश बागडे यांनी संगनमताने रक्कम रु.४९२५०५८/-चा निधी नियमबाह्य वितरित केला करिता मा. विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेत जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करून तीन महिन्यात सखोल चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश सहआयुक्त (पुनर्वसन) छत्रपती संभाजीनगर यांनी दिले आहेत.

**धुमाळ, उपजिल्हाधिकारी (समन्वय) बीड यांच्याकडून विभागीय आयुक्ताच्या पत्राला केराची टोपली**

विभागीय आयुक्तांनी ३ महिन्यात चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्यानंतरही धुमाळ उपजिल्हाधिकारी (समन्वय) बीड हे संचिका लपवून ठेवत आहेत संबंधित अधिकारीकर्मचाऱ्यावर कारवाई होऊ नये यासाठी प्रयत्न करत आहेत. गेल्या दोन महिन्यापासून प्रकरणाचा पाठपुरावा करत आहे अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी यांच्या समक्ष तक्रारीच्या अनुषंगाने कसल्याही प्रकारची मांडणी न केल्याने प्रकरण निकाली निघण्यास विलंब होत आहे. सदर प्रकरणी त्वरित कारवाई न झाल्यास वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय समोर आंदोलन करणार आहे.

------

### परळीत गावठी पिस्टल

ज्यांनी गावठी कट्टा विकत घेतला अशा दोघांना पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्यांना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. ही घटना दिनांक १६ मे रोजी घडली आहे. बीड जिल्हयातील अवैध व्यवसायांच्या विरुध्द करण्यात येणाऱ्या कारवायांचाच एक भाग म्हणून अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांविरुध्द बीडचे पोलीस अधिक्षक नवनीत कौवत यांनी मोहिम उघडलेली आहे. त्यानुसार सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा यांना आदेशित करून बीड जिल्हयात कोणत्याही प्रकारे अवैध शस्त्रांचा वापर होणार नाही याची खबरदारी घेऊन जे कोणी अवैध शस्त्रे बाळगतील अशांविरुध्द कारवाई करण्याचे आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी यांना गोपनिय बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, परळी वैजनाथ येथील रेल्वे स्टेशन परीसरात दोन इसम येत असून त्यांच्याजवळ अवैध गावठी कट्टा आहे. सदर माहितीच्या आधारे दिनांक १६/०५/२०२५ रोजी सकाळी ०५.३० वा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली परळी येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने परळी रेल्वे स्टेशन परिसरात सापळा लाऊन दोन इसम नामे अमोल रामहरी कांदे, (वय ३२ वर्षे, रा. माणिकनगर, परळी वैजनाथ), पांडूरंग प्रकाश शेंडगे,( वय ३० वर्षे, रा. एलआयसी कॉलनी, रिंगरोड लातूर) यांना पकडले. त्या दोघांची अंगझडती घेतली असता आरोपी अमोल कांदे याचे पॅन्टच्या आतमध्ये कमरेला एक गावठी कट्टा खोवलेला मिळून आला. तसेच त्यासोबत ०३ जीवंत काडतूस देखिल मिळून आले. दोन्ही आरोपी यांच्या ताब्यातून एक गावठी कट्टा/पिस्टल (अग्नीशस्त्र) व ०३ जीवंत काडतूस असा एकूण ४३,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर अवैध गावटी कट्टा/पिस्टल बाबत सदर अटक आरोपीकडे विचारपूस करता त्यांनी तो सतीष मुंडे,( रा. डाबी, ता. परळी) व मनोहर मुंडे, (रा. बेलंबा, ता. परळी) यांच्याकडून विकत घेतल्याचे प्राथमिक तपासात कबुल केले असून सदर चारही आरोपींविरुध्द पोलीस ठाणे संभाजीनगर, परळी वैजनाथ येथे पोलीस अंमलदार विष्णू बाजीराव सानप यांच्या फिर्यादीवरुन गुरनं. १०४/२०२५, कलम ३, २५ भारताचा शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. तसेच गावटी पिस्टलसह पकडलेल्या दोन इसमांना अटक करण्यात येऊन मा. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांची एक दिवस पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली. पिस्टल विकणारे दोन आरोपी सतीष मुंडे व मनोहर मुंडे यांचा गुन्हयाचे तपासी अधिकारी व सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव, हे शोध घेत आहेत. सदरील कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कावंत , अंबाजोगाई अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली बीड स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोह/विकास राठोड, पोलीस अंमलदार विष्णू सानप, नितीन वडमारे, विक्की सुरवसे यांनी केली आहे.

----------------

### बीडमध्ये जलना रोडलगत

लेखा परिक्षण विभागाची कार्यालये आणि सहकार विभागाशी संबंधित प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सहकार संकुलात समाविष्ट करुन ही सर्व कार्यालये एका छताखाली आणुन सहकार विभागाची मुख्य प्रशासकीय इमारत बांधण्याचा मार्ग या माध्यमातुन मोकळा झाला आहे. पालकमंत्री म्हणुन ना. अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर घालणारी शासकीय वास्तु जिल्हायाच्या ठिकाणी उभारत असल्याचे समाधान आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केले आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. १७ मे २०२५



## अवैधरित्या हत्यार बाळगल्या प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता–ॲड. योगेश पवार

बीड । प्रतिनिधी

शहरातील धानोरा रोड परिसरात एका आरोपीकडे कंबरेला तलवार असल्याची माहिती शिवाजीनगर पोलीसांना खबर्यांमार्फत मिळाल्यानंतर त्या आरोपीला तलवारीसह रंगेहाथ पकडून त्यावर गुन्हा नोंद करुन कारवाई करण्यात आली होती. सदरील आरोपीची आज दि.१६ मे २०२५ रोजी मुख्य न्याय दंडाधिकारी बीड श्रीमती जोशी मॅडम यांनी निर्दोष मुक्तता केली आहे.

याबाबत माहिती अशी की, कोव्हीड–१९ च्या महामारीदरम्यान बीड शहरातील धानोरा रोड परिसरात नितीन गुजर या इसमाकडे कंबरेला तलवार असल्याची खात्रीदायक माहिती खबर्या मार्फत शिवाजीनगर येथील पोलीसांना मिळाली त्यानंतर पोलीसांनी तलवारीसह आरोपीला रंगेहाथ पकडून त्याच्या विरुध्द अवैधरित्या शस्त्र बाळगल्याचा कलम लावून कायदेशीर कारवाई दाखल केली होती. आज रोजी या प्रकरणावरआरसीसी १३६/२०२० अन्वये बीड येथील मुख्य न्याय दंडाधिकारी बीड श्रीमती जोशी मॅडम यांच्या न्यायालयात सुनावणी करण्यात आली. यावेळी ॲड.योगेश पवार यांनी आरोपीच्या बाजुने योग्य तो युक्तीवाद करत आरोपीची बाजू मांडली व निर्दोष मुक्त केले त्यांना ॲड. ए. एम. चंदनशिव, ॲड. ए .एच. तांबे यांचे मार्गदर्शन लाभले.

# कृषी उत्पन्न बाजार समितीने हॉटेलमध्ये घेतलेला भूखंड लिलाव रद्द करा नसता शेतकरी महिला आत्मदहन आंदोलन करणार

**जालना । प्रतिनिधी**

**अंबड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वडीगोद्री येथील मुख्य बाजारपेठेतील भूखंड लिलाव महिला शेतकऱ्यांनी उधळून लावला होता त्यानंतरही अंबड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी २ मे रोजी शेतकऱ्यांना विश्वासात न घेता हुकूमशाही मार्गाने एका हॉटेलमध्ये गुपचूप भूखंडाचा लिलाव पार पाडला आहे असे समजते त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक करणारा लिलाव रद्द करावा, तसेच या प्रकरणी जिल्हा उपनिबंधक व उपनिबंधक कार्यालय अंबड या विभागाने चौकशी करून कारवाई करावी.अन्यथा १९ मे रोजी आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा वडीगोद्री येथील महिला शेतकऱ्यांनी दिला आहे.**

या संदर्भात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांना देण्यात निवदेनात शेतकऱ्यांनी म्हटले आहे की, वडीगोद्री भागातील शेतकऱ्यांच्या कच्च्या मालाला बाजारपेठ मिळावी तसेच व्यापार, उद्योग वाढावा कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्यात आलेली होती. मात्र, बाजार समितीचे हे उद्देश कागदावरच आहे व वडीगोद्री येथील सर्व जमीन आजपर्यंत पडीकच आहे. या बाजार समितीचा शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारचा फायदा झाला नाही.

वडीगोद्री येथे मुख्य बाजार समिती असून, बिड राष्ट्रीय महामार्गालगत समितीची ६१ एकर जमीन आहे. या जमिनीवरील प्लॉटचा लिलाव करण्याचा बाजार समितीचे सभापती व काही संचालक मंडळाकडून घाट घातला जात होता. त्यानुसार भूखंडाच्या जाहीर लिलावाची प्रक्रियाही सप्टेंबरमध्ये ठरविण्यात आली. मात्र, या लिलाव प्रक्रियेला शेतकऱ्यांनी विरोध केला. यावेळी एका महिलेसह तीन शेतकऱ्यांनी अंगावर पेट्रोल घेत आत्महदहनाचा प्रयत्न केल्याने हा लिलाव बंद पाडला. दरम्यान, सभापती अवधूत खडके यांनी शेतकऱ्यांना पुन्हा अंधारात ठेवून सदर भूखंड लिलाव जालना अंबड रोडवरील एका हटिलमध्ये हुकूमशाही पद्धतीने उरकून घेत शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. शेतकऱ्यांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणतीही कारवाई करण्यात येणार नसल्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांना विश्वासात न घेता. समितीचे सचिव यांनी लेखी पत्र शेतकऱ्यांना



देऊनही बाजार समितीने २ मे रोजी भूखंड लिलाव प्रक्रिया पार पाडला असल्याचे महिला शेतकऱ्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती वडीगोद्रीच्या मार्केट यार्ड आवारातील लिलावातील शेडची पहिल्याच पावसात दाणादाण झाल्यामुळे शेडच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे दिसून आले. १८ पत्र्याचे शेडचे काम पूर्ण होऊन अवघे ६ महिनेही पूर्ण झाले नाहीत तोच नुकत्याच झालेल्या पहिल्याच वादळी पावसात या शेडचे तीन तेरा वाजले आहेत. वडीगोद्री येथील महिला शेतकऱ्यांचे म्हणणं आहे की, आम्ही ४० वर्षांपूर्वी वडीगोद्री येथील कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी जमिनी दिलेल्या आहेत. मात्र या ठिकाणी कोणतीही बाजारपेठ उभी राहिली नाही. जमीन देऊन आम्ही भूमिहीन झालो आहोत. आम्हाला रोजगाराची कोणतीही साधनं नसल्याने आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे आम्ही आमच्या जमिनी आम्हाला परत देण्यात यावे. समितीच्यावतीने वडीगोद्री येथील सुमारे ३०० भूखंड लिलाव करण्यात येत आहेत. मात्र, या विरोधात आम्ही अनेकवेळा आंदोलनं, उपोषण केले. त्यावेळी समितीच्या सचिवांनी आम्हाला, संपादित जमिनीच्याबाबत सर्व शेतकऱ्यांसोबत चर्चा करुन त्यांना विश्वासात घेतल्याशिवाय या वडीगोद्री बाजार समिती आवारात कोणतेही काम व लिलाव प्रक्रिया केली जाणार नाही असे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, बाजार समितीच्यावतीने २ मे रोजी वडीगोद्री येथील बाजार समितीच्या सुमारे ३०० भूखंडाचे लिलाव वडीगोद्री येथे न करता अंबड येथे एका खाजगी हॉटेलमध्ये करण्यात आले. आम्हा शेतकऱ्यांना संचालक मंडळ, सभापती व सचिव यांनी विश्वासात न घेता व आम्हाला अंधारात ठेवून भूखंड लिलाव करून आमच्यावर अन्याय केला. तसेच ही भूखंड लिलाव प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली नसल्याचा आमचा आरोप आहे. सभापती अवधूत खडके यांनी मनमानी करुन हा भूखंड लिलाव केलेला असल्याने सदर लिलाव तात्काळ रद्द करावा अन्यथा आम्ही सर्व महिला शेतकरी १९ मे रोजी बाजार समितीच्या आवारात आत्मदहन करणार आहोत. यावेळी काही अनुचित प्रकार उद्भवल्यास त्यास सर्वस्वी जबाबदार सभापती अवधूत खडके ,सचिव कल्याण चोथे संचालक मंडळ व जिल्हा उपनिबंधक कार्यालय प्रशासन जबाबदार राहतील असा ईशारा संजिवनी काळे, अर्चना खोमणे, चंद्रप्रभा काळे, सुनिता उध्दव काळे, मंदा रविंद्र काळे, संगीता राजपुत, प्रेमिला भगवान काळे, उषा संदिपान काळे या महिला शेतकऱ्यांनी दिला आहे.

## वडवणी येथील आयुष्यमान आरोग्य मंदिरामध्ये राष्ट्रीय डेंग्यूदिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम संपन्न

**वडवणी। प्रतिनिधी**

**राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम १६ मे राष्ट्रीय डेंग्यू दिन जिल्हा हिवताप कार्यालय,बीड यांच्यावतीने वडवणी येथील, आयुष्यमान आरोग्य मंदिरामध्ये शुक्रवार दि.१६ मे २०२५ रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम संपन्न.**





याबाबत अधिक माहिती अशी की,लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी दरवर्षी १६ मे रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा केला जातो या दिवशी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करून डेंग्यू आजार कशामुळे होतो पावसाळ्यामध्ये या आजाराचं प्रमाण का जास्त असते प्रतिबंधात्मक उपाययोजना काय कराव्यात ज्यामुळे हा आजार होणार याची माहिती देण्यासाठी कार्यक्रम आयोजित केले जातात या अनुषंगाने वडवणी येथील आयुष्यमान आरोग्य मंदिरामध्ये १६ मे राष्ट्रीय डेंग्यू दिन जनजागृती कार्यक्रम घेऊन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी येथील,आयुष्यमान आरोग्य मंदिराचे वैद्यकीय अधिकारी डॉ.थटवले साहेब होते तर प्रमुख अतिथी व समुपदेशक म्हणून श्री. नागरे साहेब तसेच आरोग्य सेवक श्री.वाघे साहेब,आरोग्य सेवक गिरी सर,श्री.वारे सर,श्री डुकरे सर,श्रीमती गलधर मॅडम प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी,श्री.चोले सर लॅब असिस्टंट,परिचारिका उजसगरे मावशी यांच्यासह आयुष्यमान आरोग्य मंदिरांमधील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमांमध्ये रुग्णालयात आलेल्या रुग्ण व त्यांच्यासोबत असलेल्या नातेवाईकांना वेगवेगळे प्रात्यक्षिक दाखवून त्या ठिकाणी काढलेल्या रांगोळीद्वारे माहिती देण्यात आली एडिस,इजिप्ती हे डास चावल्यास डेंगू हा आजार होतो या डासांची निर्मिती पाणी साठवून राहिल्यास होते त्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून आपल्या घरासमोरचा परिसर स्वच्छ ठेवावा जसे की पाणी साठू नदेणे,टायर कुंडचा, बादल्या,कचरा,प्लास्टिक नारळाच्या करवंट्या,फुटलेल्या मातीच्या घागरी,नाले गटारी हे स्वच्छ कराव्यात ''तपासा, स्वच्छ करा आणि झाकून ठेवा:

डेंग्यूला हरविण्याचे उपाय करा. ''

''डेंगू ला आळा घालूया सर्वत्र जागरूकता पसरूया'' असे घोषवाक्यचे फलक दाखवून रुग्णालयातील रुग्णांची जनजागृती करून १६ मे राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने रुग्णालयातील कर्मचारी तसेच रुग्ण व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

## मोतीलाल कोठारी विद्यालयाचे दहावीच्या बोर्ड परिक्षेत दैदिप्यमान यश संपादित

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाच्या वतीने मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या १० वीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यात श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ संचलित मोतीलाल कोठारी विद्यालय कडा या विद्यालयाने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवत शेकडा निकाल ९९.६०% इतका लागला आहे. विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून गौरवशाली परंपरेत मानाचा तुरा रोवला आहे.**

तालुक्यातील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा शिक्षण क्षेत्रामध्ये नुकतेच १०० वर्ष पूर्ण केले आहेत. असंख्य डॉक्टर, इंजिनियर, वकील, प्रशासकीय अधिकारी घडविले आहेत. शैक्षणिक उत्कृष्टतेचे दैदिप्यमान प्रदर्शन घडविले आहे. मार्च २०२५ या परिक्षेसाठी ३०१ विद्यार्थी परिक्षेस बसले होते. २९९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शिक्षकांचे




मार्गदर्शन व विद्यार्थांच्या कठोर मेहनतीचे हे प्रतिक आहे. या यशवंत विद्यार्थ्यांमध्ये प्रथम कुमारी रसाळ रुजूला योगेश = १००%,द्वितीय कुमारी कस्तुरे श्रेया किशोर = ९८.२०% तृतीय कुमारी सबा समीर सय्यद= ९७.६०% तर ६० विद्यार्थ्यांनी ९०%पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

विद्यालयाने वर्षभराचे सुयोग्य नियोजन,काटेकोर अंमलबजावणी, अतिरिक्त विशेष मार्गदर्शन असा आपला अमोल पॅटर्न तयार केल्याने दर्जेदार निकाल लावत आपला लौकिक कायम राखला आहे. निकालाची परंपरा कायम राखल्या बाबत संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच मोतीलाल कोठारी विद्यालयाचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणा–या शिक्षकांचे अभिनंदन केले. सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच कडा पंचक्रोशीतील आजी–माजी विद्यार्थ्यांनी व आजी माजी सरपंच उपसरपंच, सदस्य ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## जिल्ह्यात ११ न्यायिक अधिकारी रुजू होणार

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हा व सत्र न्यायालयात तिन, जालना तालुका दिवाणी व फौजदारी न्यायालयात – मुख्य न्यायदंडाधिकारी,पाच वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश,दोन कनिष्ठ दिवाणी न्यायाधीश असे एकूण ११ न्यायिक अधिकारी हे दि.०८ जून रोजी रुजू होऊन त्यांच्या न्यायालयाचे कामकाजास सुरुवात करतील अशी माहिती ॲड.अरविंद एस. मुरमे यांनी दिली आहे .प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा एम. मोहिते यांनी दि.१५/०५/२५ रोजी चे कार्यालयीन आदेशानुसार जालना जिल्हा व सत्र न्यायालयात क्रमांक दोन चे जिल्हा न्यायाधीश आर.आर.राठी, क्रमांक तिन चे जिल्हा न्यायाधीश श्रीमती एन. एस. शेख, तदर्थ एक जिल्हा न्यायाधीश श्रीमती के. के.शाह.जालना तालुका न्यायालयात मुख्य न्यायदंडाधिकारी पदी जी.आर.ढेपे, वरीष्ठ स्तर सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए. पी. दिवाण,दुसरे वरिष्ठ स्तर न्यायाधीश श्रीमती एस. एम. पडोळीकर, तिसरे वरिष्ठ स्तर न्यायाधीश श्रीमती ए. आर. नागोरी, चौथे वरिष्ठ स्तर न्यायाधीश श्रीमती पी. डी. तारु, पाचव्या वरिष्ठ स्तर न्यायाधीश श्रीमती एस के दुगांवकर, कनिष्ठ स्तर सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती रुहिना अंजुम मोहम्मद युनुस, कनिष्ठ स्तर तिसरे सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती एस. एन. पुंड आदिंची नावे जिल्ह्यातील रुजू हाणारे न्यायिक अधिकारी म्हणून समावेश आहे असेही ॲड. अरविंद एस. मुरमे यांनी सांगितले आहे.

## वादळ वाऱ्यामुळे सोलारचे नुकसान



घनसावंगी । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील बोरगाव खुर्द येथे अचानक वादळ वाऱ्यामुळे गंगाबाई दिलीप भानुसे या महिलेच्या शेतामध्ये गट क्रमांक ७७ मध्ये जे के कंपनीचं सोलरची अचानक वादळ वाऱ्यामुळे दि ६ मे २०२५ रोजी सोलर वाकड तिकडं होऊन नुकसान झाली आहे. बोरगाव खुर्द येथील भानुसे याची शेत जमीन बोरगाव खुर्द शिवारात गट नंबर ७७ असून त्यांना जे के कंपनीचे सोलर बसण्यात आले होते. ६मे२०२५ रोजी वादळे वारे झाल्यामुळे सोलारच्या वाकडं तिकडं होऊन पाट्या फुटल्याने नुकसान झाले आहे.

## राष्ट्रीय अधिवेशनासाठी इच्छुकांनी नोंदणी करावी–हस्तीमल बंब

जालना । प्रतिनिधी

महावीर इंटरनशनल जालना सेंटर रॉयलच्या कार्यकारिणीची महत्वपुर्ण बैठक महाराष्ट्र व गुजरात राज्याचे विस्तार प्रमुख हस्तीमलजी बंब यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५ मे २०२५ रोजी घेण्यात आली. बैठकीचे प्रास्ताविक करताना विजयराज सुराणा यांनी उपस्थित सर्वांचा शब्द सुमनाने स्वागत करून आपल्या कार्यकारिणीच्या कार्यकाळ पूर्ण झाल्याने निवडीचे प्रस्ताव मांडले. सर्व कार्यकर्तांनी तन–मन–धनाने सेवा कार्यात आपले योगदान दिलेले आहे. सर्वच धन्यवादाचे पात्र आहे या मुळेच मागील राज्य अधिवेशनात जालना शाखेला उत्कृष्ट कार्या बद्दल पुरस्कार सुध्दा मिळालेला आहे, यात श्री बंब यांचा फार मोठा योगदान आहे, असे सुराणा म्हणाले. अध्यक्ष भाषण करताना हस्तीमलजी बंब म्हणाले महावीर इंटरनशनल संपुर्ण देशात ५० वर्षापासून सामाजिक सेवाभावी कार्यात अग्रगण्यी नोंदणीकृत संस्था आहे. अंपग, विकलांग, दिन–दुःखी, गोर–गरीब, गरजुं लोकांना मदत करणे संस्थेचे मुख्य उद्देश्य आहे. जालना शाखाचे कार्य राज्यात अव्वल आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा आहे. येत्या जुलाई ५ आणि ६ असा दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन राजस्थान प्रदेशात जयपुर येथे होणार आहे. या अधिवेशनात देश–विदेशातील मान्यवरांचे मार्गदर्शन मिळणार आहे. प्रत्येक राज्यातील विभाग, जिलावार उत्कृष्ट कार्य बद्दल पुरस्कार प्रदान करण्यात येईल. या अधिवेशनासाठी महिला–पुरुष इच्छुक कार्यकर्तांनी त्वरीत नोंदणी करावी. पुढील कार्यकाळासाठी अध्यक्ष पदी विजयराज सुराणा यांचे नांव सुचविले, उपस्थित सर्वांनी सहमती दिली व श्री बंब यांच्या हस्ते श्री सुराणा यांचा सत्कार करण्यात आला. श्री सुराणा यांनी कार्यकारिणी जाहीर केली. अध्यक्ष पदी विजयराज सुराणा, उपाध्यक्ष कचरुलाल पाटणी, सचिव देवेन्द्र सावजी, सहसचिव पार्श्वनाथ अंबेकर, कोषाध्यक्ष अजित श्रीश्रीमाल, कार्यकारिणीत संजय मुथ्था, पवनराज सुराणा, प्रितेश कुचेरिया, दिनेश छाजेड, दीपक मोदी, निलेश कुंकूळोल, सुभाष सोनुने, मकरंद सावजी, सुदर्शन चिप्पा, पवन गोयल, प्रमोद जोशी, सल्लागार म्हणून ॲड. अभय सेठिया यांना समाविष्ठ करण्यात आले. सर्वांना सोबत घेऊन हस्तमल बंब यांच्या मार्गदर्शनाखाली जोमाने कार्य करू असे सुराणा म्हणाले. बैठकीचे सुत्र संचालन व आभार सचिव देवेन्द्र सावजी यांनी मांडले.

पान ६ वरून...

### माजी सैनिकांचा सन्मान

स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर अमरसिंह पंडित यांचा आगळावेगळा वाढदिवस साजरा होणार आहे. पहलगाम घटनेनंतर भारतीय सैन्याने केलेल्या कामगिरीचा प्रत्येक भारतीयांना अभिमान असुन भारतीय सैन्य दलातील जवानांप्रती आदरभाव निर्माण झाला आहे. या पार्श्वभुमीवर माजी सैनिकांचा सन्मान करुन वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय शारदा स्पोर्ट्स अकॅडमी व रणवीर पंडित मित्र मंडळाने घेतला आहे. शनिवार दि. १७ मे रोजी सकाळी ११ वा. गेवराई शहरातील कृष्णाई निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी निवृत सुभेदार कॅप्टन रामकृष्ण चेडे, छत्रपती संभाजीनगर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष डॉ. मयुर सोनवणे, बीड पंचायत समितीचे माजी सभापती बळीराम गवते, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अजिंक्य आनेराव यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात गेवराई तालुक्यातील माजी सैनिकांचा सन्मान केला जाणार आहे.

कृष्णाई येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. मौजे मादळमोही येथे जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजेंद्र वारंगे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारातुन शनिवार दि. १७ मे रोजी सकाळी १० वा. रणवीर पंडित यांची भव्य पेढेतुला होणार आहे. गेवराई शहरातील मोहसिन शेख यांच्या पुढाकारातुन भव्य सामान्य ज्ञान स्पर्धा आणि सायंकाळी गेवराई शहरात वाढदिवसानिमित्त ठिक–ठिकाणी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आलेले आहे. कृष्णाई येथे आयोजित केलेल्या माजी सैनिकांच्या सन्मान सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे.

### गोदावरी व सिंधफाना नदीपात्र

प्रशासनाकडून मंजुरी मिळाली असल्याची माहिती आ.प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.यामधे पिण्याच्या पाण्यासाठी माजलगाव धरणातुन तारूगव्हाण (पोहनेर) ता.पाथरी,जि.परभणी उच्च पातळी बंधाऱ्यात पाणी सोडले जाईल.तसेच पिण्याच्या पाण्यासाठी गोदावरी नदीपात्रात पैठण उजव्या कालव्यातून पाणी सोडले जाईल.व वडवणी तालुक्यातील पिण्याच्या पाण्यासाठी कुंडलिका प्रकल्पा मधून नित्रुड पाटबंधारे तलावासाठी सोडले जाईल.पिण्याच्या पाण्यासाठी माजलगाव धरणातून सिंधफणा नदी पात्रात पाणी सोडले जाईल.पाणी सुस्थित सांभाळण्याची जबाबदारी संबंधित ग्रामस्थांची राहिल,पाण्याचा काटकसरीने वापर करून दुरपयोग होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन आ.प्रकाश सोळंके यांनी संबंधित गावातील ग्रामस्थांनी केलें आहे.

### कासारी येथे बैलगाडा

संयोजकांनी अचूक निर्णय व्हावा यासाठी खास लाईव्ह व्हिडिओ ग्राफीची व्यवस्था केली होती.यावेळी धाकलगावच्या पक्षा – पिस्टन बैलजोडीने रोमांचकारी विजय मिळवला. याकुब भाई पिंपळगाव च्या पुष्पा–भारत बैलगाडा द्वितीय, श्रीधर बाबुराव बडे, कासारी यांची लक्षा–बादशहा बैलजोडी तृतीय, ओमसाई प्रसन्न,छ.संभाजीनगरची राणा–सर्जा चौथा, सती सामंत पाचवा, परमेश्वर काकडे बालानगर, रेणुका माता प्रसन्न देवीदेगांव, जय हनुमान प्रसन्न आंबड या बैलजोड्या सहाव्या क्रमांकावर समान राहत विजय मिळवला. विजयी बैलगाडा मालकांना जयसिंह सोळंके, भरत नागरगोजे, नामदेव नागरगोजे,श्यामसुंदर बडे, बालाजी घुले,राजु सय्यद, दिपक मोरे,प्रशांत उघडे, जमीर पटेल सय्यद आदी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. सर्व रोमांचकारी सामन्यांमध्ये उपस्थित मंत्रमुग्ध झाले होते.विजयी बैलगाडा मालकांनी मैदानावर गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा केला. कासारी ग्रामस्थांनी स्पर्धेचे चोख नियोजन केले होते. चित्रफित द्वारे अचूक निकाल देण्यात आला. बैलगाडा शर्यत यशस्वी करण्यासाठी आयोजक राजेंद्र बडे, दादासाहेब बडे,दत्ता केंद्रे, प्रशांत बडे, ऋषी बडे, बाबा शेख, विठ्ठल बडे, समाधान बडे, गोरक्षनाथ बडे,बाजीराव उघडे, चंद्रवदन घुले,संभाजी फड, बप्पा बडे, गणेश बडे ,प्रकाश घुले, तुकाराम बडे ,मैदान मालक नितीन बडे सह गावातील सर्व तरुण कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. झेंडा पंच म्हणून निलेश बोरगांवकर यांनी काम केले.स्पर्धेचे समालोचन अशोक खेत्रे व ऋषी सुरनर पहाडी आवाजात केले.

### मानवलोक –जनसहयोगच्या

समजतात परंतु असे समजायचे नाही, समाजात अनेक कुटुंब असे आहेत की मोठे मोठे वाढदिवस साजरे करतात ते न करता अशा कार्यासाठी त्यांनी हातभार लावावा जेणेकरून अशा कुटुंबांना आधार मिळेल. मी जरी एका कुटुंबाची वर्षभरासाठी किराणा सामान किट देण्यासाठी जिम्मेदारी घेतली असली तरी माझ्या जवळीत जे सधन कुटुंब आहेत त्यांना सुद्धा यामध्ये मदत करण्यासाठी प्रोत्साहित करेल. मी कॉलेजमध्ये असताना बाबूजींचे व्याख्याने भाषणे ऐकलेली आहेत मानवलोकच्या माध्यमातून खत, बी बियाणे तसेच शेतकऱ्यांना विहिरी शेती मशागतीसाठी अनेक अवजारे देऊन त्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ कशी होईल हे मी पाहिलेले आहे. माझ्या आई–वडिलांची जेवढी सेवा करता येईल तेवढी मी केली परंतु आज समोर बसलेले आई वडिलां समान असलेले सर्वजण यांची सेवा करण्याची संधी मिळाली असे ते म्हणाले या कार्यक्रमासाठी शाम सरवदे, संजना आपेट, सावित्री सागरे, दिलीप मारवाळ आदीनी परिश्रम घेतले


cmyk




# बाजार समित्यांबाबत निर्णय घेताना शेतकऱ्यांचे हित सर्वोच्च - उपमुख्यमंत्री अजित पवार

पुणे : राज्यातील बाजारांचा विकास करताना शेतकऱ्यांचं हित जपले पाहिजे. बाजार समित्यांसदर्भातील निर्णय घेत असताना शेतकऱ्यांते हित सर्वोच्च असावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिले आहेत. कृषी उत्पन्न बाजार समित्यासंदर्भातील विविध प्रश्नांवर उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती.

केंद्र सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण विभागाच्या नवीन २०१७ च्या कायद्यातील तरतूदीनुसार महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) या १९६३ च्या कायद्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, पणनमंत्री जयकुमार रावल यांच्यासह संबधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, '' राष्ट्रीय नामांकित बाजार प्रस्तावानुसार राष्ट्रीय बाजार समिती



स्थापन झाल्यानंतर शासनाकडून त्यासमितीवर नामनिर्देशित व्यक्तींची नियुक्ती होणार आहे. शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करुनच यासंदर्भातील निर्णय घ्यावा,'' अशी सूचनाही उपमुख्यमंत्री पवार यांनी केली आहे. या बैठकीत राज्यस्तरीय बाजार विकसित करणे, कृषी उत्पन्न बाजार समिती कर सुधारणा करणे, कृषी उत्पन्न बाजार समित्यांची देखभाल दुरुस्ती, वस्तू व सेवाकराबाबत अडचणी, छोटे उद्योग व व्यापाऱ्यांच्या व्यवसाय कराबाबतच्या समस्या, कळंबोली येथे स्टील मार्केटसाठी सिडकोच्या माध्यमातून जमीन उपलब्ध करुन देणे आदी विषयांवर चर्चा झाली. शेतकरी हितासाठी सर्वोच्च स्थान असल्याचं उपमुख्यमंत्री पवार म्हणाले. ते म्हणाले, ''राष्ट्रीय नामांकित बाजार अनुषंगाने राज्यस्तरीय बाजारांचा विकास करताना राज्यातल्या शेतकऱ्यांचे हित जपले गेले पाहिजे. बाजार समिती सदस्यांच्या अधिकारांचे रक्षण झाले पाहिजे. बाजार समिती सदस्य जनप्रतिनिधींमधून निवडून येतात. शेतकऱ्यांचे, समाजातील विविध घटकांचे प्रतिनिधीत्व करतात. या सदस्यांचे अधिकार कायम ठेवण्यातच शेतकरी व समाजाचे हित आहे. यातूनच बाजार समित्या अधिक कार्यक्षम, बळकट होतील.''

जीएसटी आकारणीत सुसूत्रता, व्यापाऱ्यांना अकारण होणारा त्रास थांबवण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. करचुकवेगिरी रोखण्यासाठी जीएसटी वसुली पद्धतीत सुधारणांसंदर्भात व्यापारी संघटनांनी केलेल्या मागण्यांवर सकारात्मक विचार केला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिली. तसेच उद्योग, व्यापार क्षेत्रात अधिक सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री पवार यांनी बैठकीत दिल्या.

## चिकू फळावर होणारे किटक अन त्यावर उपाययोजना



सध्या अनेकांचा कल हा फळबाग लागवडीकडे वळला आहे. त्यामुळे अनेकजण फळबाग लागवड करत आहेत. यामध्ये चिकूची देखील लागवड शेतकरी करत आहेत. चिकू हे देशातील लोकप्रिय फळ आहे. मात्र, त्याची किंमत जास्त असल्याने ती अजूनही अनेकांच्या आवाक्याबाहेर आहे. चिकूची लागवड करून शेतकरी चांगला नफा मिळवू शकतात. भारतात याची लागवड प्रामुख्याने कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये केली जाते. मात्र चिकूमध्ये अनेक हानिकारक कीटक आणि रोग आढळून आल्याची माहिती मिळत आहे. ज्यावर योग्य वेळी नियंत्रण न मिळाल्यास पिकाचे मोठे नुकसान होते. त्यामुळे यावर योग्य वेळी नियंत्रण मिळवणे खूप गरजेचे आहे.

पानांचे जाळे : चिकूच्या झाडावर पानांच्या जाळ्याने हल्ला केल्यावर पानांवर गडद तपकिरी ठिपके दिसतात. त्यामुळे पाने सुकतात आणि झाडाच्या फांद्याही हळूहळू सुकतात. त्यामुळे बागायतदारांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे याचे वेळीच निरीक्षण करून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. यावर नियंत्र करण्यासाठी नवीन कोंब तयार होण्याच्या वेळी किंवा फळे काढणीच्या वेळी कार्बारील ६०० ग्रॅम किंवा क्लोरपायरीफॉस २०० मि.ली. किंवा क्विनालफॉस ३०० मि.ली. १५० लिटर पाण्यात मिसळून २० दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. असे केल्यास यावर नियंत्रण मिळवता येईल.

अंकुर सुरवंट : अंकुर सुरवंट हा कीटक वनस्पतींसाठी अतिशय धोकादायक आहे. वास्तविक, सुरवंट वनस्पतींच्या कळ्या खाऊन नष्ट करतात. यामुळे तुमच्या उत्पन्नात मोठी घट होण्याची शक्यता असते. यावर नियंत्रण करण्यासाठी क्विनालफॉस ३०० मि.ली किंवा फेम २० १५० लिटर पाण्यात मिसळून प्रति एकर फवारणी करावी. ही फवारणी केल्यास रोगावर नियंत्रण ठेवता येईल.

केसाळ सुरवंट : चिकू पिकामध्ये हे कीटक कोवळ्या कोंबांचा आणि वनस्पतीला अन्न बनवून त्यांचा नाश करतात. उत्पादकतेवर मोठा परिणाम होतो. यावर नियंत्रण करण्यासाठी क्विनालफॉस ३०० मि.ली १५० लिटर पाण्यात मिसळून प्रति एकर फवारणी करावी. वरील तीन कीटकांचा प्रादुर्भाव चिकूवर प्रामुख्याने आढळून येतो. त्यामुळे तुम्हाला चिकूची योग्य ती काळजी गरजेचे आहे.

### श्री लक्ष्मी नृसिंह शुगर्सने रखडवीले शेतकऱ्यांचे ऊस बील

## शेतकरी आंदोलनाच्या पवित्र्यात

परभणी : पूर्णा तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांच्या ऊसाचे बील आमडापूर येथील एल एल पी शुगर्स साखर कारखान्याने रखडविले आहे. गळीत हंगाम २०२४-२५ या चालू वर्षी पूर्णा तालुक्यातील शिवारातून जवळपास १ लाख टन ऊस श्री लक्ष्मी नृसिंह शुगर्सने गाळपासाठी नेला होता. त्यापैकी जानेवारी २०२५ या महिन्यात खरेदी केलेल्या ऊसाचे बील प्रती टन २५०० (अडीच हजार रुपये) संबंधित शेतकऱ्यांना अदा केल्याची माहिती कृषी मदतनीस पूर्णा विभाग नवनाथ क-हाळे यांनी दिली. मात्र फेब्रुवारी महिन्यात ऊसतोड करुन गाळपासाठी नेलेल्या ऊसाचे बील अद्याप देण्यात आले नाही.

पूर्णातील ज्या अनेक शेतकऱ्यांनी आपला ऊस दिला अशा जवळपास २५ हजार टन ऊसाचा पहिला हप्ता २५०० रुपये अजूनही दिला नाही. त्यामुळे संबंधित शेतकरी या साखर कारखाना चालक मालका विरुद्ध बोंब ठोकत आहेत. शेतक-यांच्या ऊसाचे एकूण कोट्यवधी रुपये बील रखडवून आता हा श्री लक्ष्मी नृसिंह शुगर्स साखर कारखाना मुळमालकाने विक्रीस काढल्याची माहिती समोर आल्यामुळे संबंधित ऊस उत्पादक शेतकरी परेशान झालेत. त्यांना आपल्या ऊसाचे बील मिळते की नाही? असा प्रश्न पडला आहे.

सदर कारखान्याने आमची फसवणूक केल्याच्या प्रतिक्रिया शेतकरी देत आहेत. अनेकदा ज्यांचा ऊस नेला अशा शेतकऱ्यांनी कारखाना साईटवर जाऊन बिलाची मागणी केली परंतु आज देवू उद्या देवू म्हणून त्यांना भुलथापा देण्यात आल्या. कारखाना बंद होवून दोन महिने उलटून जावूनही फेब्रुवारी महिन्यातील बील अदा केले नाही. त्यामुळे हे शेतकरी आता आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

## पालकाच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती

शेतकरी चांगला नफा मिळविण्यासाठी पालकाची लागवड करू शकतात. पालकाचे बरेच प्रकार आहेत, ज्याची माहिती खाली दिली आहे. भारतात पालकाची लागवड रब्बी, खरीप आणि उन्हाळी या तीनही पीक हंगामामध्ये केली जाते. यासाठी शेतात पाण्याचा निचरा करण्याची चांगली व्यवस्था असावी. तसेच हलक्या चिकणमाती जमिनीत पालकाच्या पानांचे चांगले उत्पादन मिळते.



या गोष्टींकडे विशेष लक्ष द्या : पेरणीपूर्वी बियाण्यास २ ग्रॅम कॅप्टन प्रति किलोग्रॅमची प्रक्रिया करावी, जेणेकरून उत्पादन चांगले मिळेल. पेरणीसाठी ओळीपासून ओळीपर्यंत २५-३० सेंमी आणि रोपापासून रोपापर्यंत ७-१० सेमी अंतर ठेवावे. पालक लागवडीसाठी, हवामान आणि मातीनुसार जास्त उत्पादन देणारे सुधारित वाण निवडू शकतात.देशी पालक : देशी पालक बाजारात चांगल्या दराने विकला जातो. देशी पालकाची पाने लहान, गुळगुळीत आणि अंडाकृती असतात. ते खूप लवकर तयार होते, म्हणून बहुतांश शेतकरी त्याची लागवड करतात.विलायती पालक : परदेशी पालकाच्या बिया गोल आणि काटेरी असतात. डोंगराळ आणि थंड ठिकाणी काटेरी बियाणे वाढवणे अधिक फायदेशीर आहे. मैदानी भागातही गोल जातींची लागवड केली जाते.ऑल ग्रीन : हिरव्या पालेभाज्या पालकाची जात १५ ते २० दिवसांत तयार होते. एकदा पेरणी केल्यानंतर ते सहा ते सात वेळा पाने कापू शकते. ही वाण निःसंशयपणे जास्त उत्पादन देते, परंतु हिवाळ्यात लागवड केल्यास ७० दिवसांत बियाणे आणि पाने तयार होतात.पुसा हरित : वर्षभराचा खप भागवण्यासाठी अनेक शेतकरी पुसा हरितची लागवड करतात. त्याची वाढ सरळ वरच्या बाजूस असते आणि त्याची पाने गडद हिरवी आणि आकाराने मोठी असतात. क्षारयुक्त जमिनीवर त्याची लागवड करण्याचे अनेक फायदे आहेत.

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १६५ गावे पूरप्रवण

संभाजीनगन / वृत्तसंस्था

जिल्ह्यात १६५ गावे ही पूरप्रवण आहेत. या गावांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाची कामे १ जूनच्या आत पूर्ण करावी. पुराचा धोका संभावणारी गावे, किंवा पुराच्या पाण्याने वेढली जाणारी गावांमध्ये जलशुद्धीकरणाची औषधी, साथरोगाची औषधे, अत्यावश्यक अन्नधान्य साठ्याची व्यवस्था करून ठेवावी. पुलांचे, धरणांच्या बंधाऱ्यांची देखभाल दुरुस्ती करून घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिल्या आहेत.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची मॉन्सून पूर्वतयारी आढावा बैठक जिल्हा नियोजन सभागृहात नुकतीच पार पडली. या बैठकीत ही माहिती पुढे आली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्यासह अपर जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, आपत्ती निवारण कक्षाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, अपर आयुक्त मनपा रणजित पाटील, ऋषिकेश सूर्यवंशी, मारुती म्हस्के तसेच सर्व संबंधित यंत्रणा प्रमुख उपस्थित होते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती म्हस्के यांनी माहितीचे सादरीकरण केले. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले, की १ जूनपर्यंत २४ बाय ७ नियंत्रण कक्ष कार्यान्वित करावा. ग्रामपातळीवरील अधिकाऱ्यांसह सर्व अधिकाऱ्यांनी



मुख्यालयी थांबावे, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. नागरिकांनीही आपापल्या घरांच्या डागडुजीची, दुरुस्तीची किरकोळ कामे पावसाळ्याच्या अनुषंगाने करून घ्यावी असे आवाहन केले. बैठकीतील माहितीनुसार, जिल्ह्यात गोदावरी नदी काठावर निळ्या रेषेखाली येणारी पैठण तालुक्यात १८, तर वैजापूर तालुक्यात १७ व गंगापूर तालुक्यात ८ अशी एकूण ४३ गावे आहेत. पैठण तालुक्यात पैठण शहर, कावसान, दादेगाव- जहाँगीर, नायगाव, वडवळी, नवगाव व वैजापूर तालुक्यातील डोणगाव, बाबतारा, लाखगंगा, नांदूरढोक, बाभूळगाव, बाजाठाण या गावांना पुरामुळे वेढा पडतो. तर जिल्ह्यात कायगाव (ता. गंगापूर) येथे छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर रस्ता व पैठण येथून शेवगावकडे जाणारा रस्ता असे गोदावरी नदीवरील पूल पुराने बाधित होतात. आपत्तीच्या प्रसंगी बचाव कार्यात मदत करण्यासाठी प्राधिकरणाकडे ५ बोटी, १९५ लाइफ जॅकेट्स, १६० लाइफ बॉय, २१५ बचाव साहित्य किट, ८१५ फोल्डिंगचे स्ट्रेचर, ८१५ बॉडी कव्हर बॅग्ज, १३२ सेफी हेल्मेट्स, १० रेस्क्यू क्राफ्ट्स, आपत्कालीन प्रकाश योजनेचे १७ संच, २७६ गम बूट जोडे, तात्पुरते उभारावयाचे २० तंबू, ५ दुर्बिणी असे साहित्य असून जिल्ह्यात ७९ ठिकाणी वीज अटकाव यंत्रणा बसविण्यात आली आहे.

तालुकानिहाय पूरप्रवण गावे

जिल्ह्यात छत्रपती संभाजीनगर तालुक्यात १६, पैठण तालुक्यात १५, फुलंब्री तालुक्यात ७, वैजापूर तालुक्यात ३१, गंगापूर तालुक्यात २६, खुलताबाद तालुक्यात ६, सिल्लोड तालुक्यात १०, कन्नड तालुक्यात ४८ तर सोयगाव तालुक्यात ६ अशी एकूण १६५ गावे ही पूरप्रवण आहेत.




### महत्वाच्या घटना

१८६६ : अमेरिकेत पाच सेन्ट किंवा निकेल हे नाणे व्यवहारात आणले.
१८९९ : क्रांतिकारक बाळकृष्ण चाफेकर यांना फाशी.
१२०४ : बाल्डविन नववा पहिला लॅटिन सम्राट झाला.
१६०५ : पॉल पाचवा पोपपदी.
१९१८ : अमेरिकेत सरकारवर टीका करणे हा तुरुंगवासास पात्र गुन्हा ठरवण्यात आला.
१९२० : पोप बेनेडिक्ट पंधराव्याने जोन ऑफ आर्कला संत ठरवले.
१९२९ : हॉलिवूडच्या ॲकेडमी ऑफ मोशन पिक्चर, आर्ट्स अँड सायन्सेस या संस्थेतर्फे चित्रपटांतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल स्मृतिचिन्ह देण्याचा पहिला समारंभ झाला. याच पारितोषिकांना पुढे ऑस्कर असे नाव पडले.
१९६९ : सोवियेत संघाचे अंतराळयान व्हेनेरा ५ शुक्रावर उतरले.
१९७५ : सिक्कीममधील जनतेने कौल दिल्यावर भारताने सिक्कीमला देशाचा भाग करून घेतले.
१९७५ : जुन्को ताबेई एव्हरेस्टवर चढणारी प्रथम स्त्री ठरली.
१९९३ : बचेन्द्री पालच्या नेतृत्वाखालील पहिल्या महिला भारतीय मोहिमेने सात मुलींसह अठरा गिर्यारोहकांना एव्हरेस्ट पादाक्रांत करण्याचा मान मिळवून दिला व नवा जागतिक विक्रम नोंदविला.
१९९२ : स्पेस शटल एन्डेव्हरची प्रथम अंतराळयात्रा सफल.
१९९६ : भारताचे १० वे पंतप्रधान म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांनी सूत्रे हाती घेतली. मात्र आवश्यक पाठिंबा न मिळाल्यामुळे त्यांचे सरकार केवळ १३ दिवस टिकले.
२००० : बॅडमिंटन अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी तसेच खेळांचे दूरचित्रवाणी प्रसारण सुलभ करण्यासाठी या खेळातील गेम १५ ऐवजी ७ गुणांचा करण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन महासंघाच्या क्वालालंपूर येथील बैठकीत घेण्यात आला. मात्र २००६ मधे हा नियम परत बदलला गेला.
२००५ : कुवेतमधे स्त्रियांना प्रथमच मतदानाचा हक्क प्राप्त झाला.
२००५ : अमेरिकन वैज्ञानिकांनी क्लोन केलेल्या मानवी भ्रूणाच्या शरीरातून स्टेम पेशी काढण्यात पहिल्यांदा यशस्वी झाले.
२००७ : निकोलाय सारकॉझी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२५ : आद्य गणिती, आधुनिक भास्कराचार्य केरुनाना लक्ष्मण छत्रे यांचा जन्म. (मृत्यू: १९ मार्च १८८४)
१८३१ : मायक्रोफोन चे सहसंशोधक डेव्हिड एडवर्ड ह्यूजेस यांचा जन्म. (मृत्यू: २२ जानेवारी १९००)
१८२४ : महान गणितज्ज्ञ केरो लक्ष्मण छत्रे यांचा जन्म
१८५७ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पटना येथील २७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष रघुनाथ मुधोळकर यांचा जन्मदिन.
१९०५ : अमेरिकन अभिनेते हेन्री फोंडा यांचा जन्म. (मृत्यू: १२ ऑगस्ट १९८२)
१९२६ : माणिक वर्मा, शास्त्रीय व सुगम संगीत गायिका.
१९३१ : के. नटवर सिंग, भारतीय परराष्ट्र मंत्री.
१९४१ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय टक्करवादक बनामाली महाराणा यांचा जन्मदिन.
१९४४ : महाराष्ट्रातील एक प्रसिध्द लोकनेते अभयसिंह राजे भोसले यांचा जन्म
१९५३ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय बायोफिजिकल वैज्ञानिक प्राचार्य रामकृष्ण विजयाचार्य होसूर यांचा जन्मदिन.
१९५५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय हातमाग उद्योजक गजम अंजैया यांचा जन्मदिन.
१९७० : गॅब्रियेला सॅबाटिनी, आर्जेन्टिनाची टेनिस खेळाडू.
१९७५ : निरोशन बंदरतिलके, श्रीलंकेचा क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६५ : पुरंदर किल्ला लढविताना मराठेशाहीतील स्वामीनिष्ठ सरदार मुरारबाजी देशपांडे यांचे प्राणार्पण
१८३० : फ्रेन्च गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ जोसेफ फोरियर यांचे निधन. (जन्म: २१ मार्च १७६८)
१९२६ : महमद सहावा, शेवटचा ओस्मानी सम्राट.
१९५० : कोल्हापूर संस्थानचे दिवाण व शिक्षणमंत्री अण्णासाहेब लठ्ठे यांचे निधन. (जन्म: ९ डिसेंबर १८७८)
१९७७ : माली देशाचे पहिले अध्यक्ष मादीबो केएटा यांचे निधन. (जन्म: ४ जुन १९१५)
१९९० : द मपेट्स चे जनक जिम हेनसन यांचे निधन. (जन्म: २४ सप्टेंबर १९३६)
१९९४ : माधव मनोहर, लेखक, समीक्षक.
१९९४ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथा लेखक फणी मुजुमदार यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १९११ फरिदपूर, बांगला देश)
२००० : माधव गोविंद काटकर, मराठी कवी.
२००८ : ओपस वन व्हाइनरी चे सहसंस्थापक रॉबर्ट मोन्डवी यांचे निधन. (जन्म: १८ जुन १९१३)
२०१४ : टाटा स्टीलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक रुसी मोदी यांचे निधन. (जन्म: १७ जानेवारी १९१८)

# भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ तिरंगा रॅलीत परळीकरांचा उत्स्फूर्त सहभाग

## माजी सैनिकांचा सन्मान,श्रध्दांजलीनंतर राष्ट्रगीताने समारोप

परळी। प्रतिनिधी

भारतीय सैन्य दलाने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानला मात देत दाखवलेल्या अतुलनीय शौर्याला सलाम करण्यासाठी परळी येथे पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे व मा. खासदार प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.देशभक्तीच्या जयघोषात परळीकरांनी या रॅलीत उस्फुर्तपणे सहभाग नोंदवला.मोंढा मैदान येथे पाच माजी सैनिकांचा सन्मान, शहीदांना श्रद्धांजली व राष्ट्रगीताने तिरंगा रॅलीचा समारोप झाला.

जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादी तळांवर अचूक हल्ले करत १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा केला.

या अभूतपूर्व कारवाईने भारतीय सैन्याने देशाचे मान उंचावली असून, या शौर्याला सलाम करण्यासाठी देशभरात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे. दि. १५ मे रोजी दुपारी ४.१५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून भाजपा तालुकाध्यक्ष राजेश गित्ते,निर्मळ,शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा रॅलीस सुरुवात झाली. भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ घोषणा देत ही रॅली एकमिनार चौक,स्टेशन रोड,भवानी नगर,रोडे चौक,राणी लक्ष्मीबाई टॉवर मार्गे आल्यानंतर मोंढा मार्केट येथे माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.शहीदांना श्रध्दांजली अर्पण करत समारोप करण्यात आला.





या रॅलीत भाजपा तालुकाध्यक्ष राजेश गित्ते व वसंत निर्मळ, परळी शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांच्यासह जेष्ठ नेते दत्तापा ईटके, विकासराव डूबे, जुगलकिशोर लोहिया, रमेशराव कराड, सतीश मुंडे, संदीप लाहोटी, शांतीलाल जैन, अनिल तांदळे, महेश्वर निर्मळे, प्रकाश जोशी, दत्ता कुलकर्णी, डॉ शालिनीताई कराड,श्रीराम मुंडे, रवी कांदे, मारोतराव फड, सुग्रीव ( बापू) मुंडे , गणपतप्पा सौन्दळे, प्रा बिभीषण फड, राजेंद्र ओझा, वैजनाथ जगतकर, महादेव ईटके, उमेश खाडे, अरुण पाठक, नितीन समशेट्टे, अनिष अग्रवाल, संजय मुंडे, नितीन ढाकणे, बाळासाहेब चव्हाण, बाळासाहेब फड, रमेश गायकवाड, सुंदर मुंडे, वैजनाथ रेकणे, बंडूनाना कोरे, योगेश पांडकर, विजयकुमार खोसे, डॉ. कुणाल जैन, कुलभूषण जैन, पवन मोदाणी, रमेश गायकवाड, सुधाकर पोळ, सुशील हरंगूळे, नरेश पिंपळे,अमोल डुबे, चंदाताई ठोंबरे, सारिका कुरील, सरला उपाधाय, चित्राताई देशपांडे,पवन तोडकरी, दिलीप नेहरकर, बंडू नाना कोरे, श्रीपाद शिंदे, अच्युत जोगदंड सर, दिपक जगतकर, उमेश निळे, शेख शमी, राहुल घोबळे, शेख खदिर, योगेश मुंडे, दिनेश आंधळे,माणिक कराड,माऊली आंधळे, भाऊसाहेब गित्ते, अनिल गुट्टे, धुराजी साबळे, दशरथ गुट्टे, जनार्दन मुंडे, राजाभाऊ मुंडे, गोपाळ केंद्रे, केशव गित्ते, तुकाराम गित्ते ,संतोष राठोड, हनुमंत नागरगोजे, राजाभाऊ भांगे, बालाजी गुट्टे,ज्ञानेश्वर मुंडे, चैतन्य मुंडे, धनंजय आंधळे, नारायण गुट्टे , देहू आघाव, रुस्तुम केंद्रे, दत्ता गोल्हेर, सुनील केंद्रे, शैलजा आदोडे, दत्तू गुट्टे , कांता आबा सोनवणे, सुरेश माने, माऊली साबळे, पिंटू शेठ कोपनर, पेंटर विष्णू रोडगे, भुजंग जाधव, संतोष धानोरकर, तुकाराम आचार्य, संतोष सोळंके, बळीराम गडदे, संत रामजी गडदे, लक्ष्मण कावळे, मुरलीधर पारवे, विकास पाळवदे, माणिक कराड, विक्रम मिसाळ, गोविंदरावजी कांदे, विनोद निर्मळ, धीरज चिंचाने, राजेभाऊ सपकाळ, बाबुरावजी कदम, सागर देशमुख, बबन बाप्पा मुठाळ, अनिरुद्ध अंभोरे, एकनाथ लांब, बाळासाहेब शिंदे, मधुकर जाधव, दिलीप राठोड, अविनाश देशमुख आदी शेकडो नागरिक सहभागी झाले होते.

## पाटोदा आगारातून जामखेड- कुसळंब-अंमळनेर मार्गे पैठण मुक्कामी बस सुरू करा

पिंपळवंडी । प्रतिनिधी

जामखेड आगाराची अनेक वर्षापासून सौताडा- वांजरा फाटा-कुसळंब-पिंपळवंडी-अंमळनेर-पांढरवाडी फाटा-पाथर्डी-शेवगाव मार्गे सुरू असलेली जामखेड-श्री क्षेत्र पैठण मुक्कामी बस कोरोनाच्या काळात बंद करण्यात आली.ती अद्यापर्यंत पूर्ववत सुरु न केल्याने या परिसरातील प्रवाशांची मोठी गैरसोय व हेळसांड होत आहे.ही बस जामखेड आगारातून दुपारी २:३० वाजता निघून पैठण येथे रात्री ८ वाजता मुक्कामी थांबून सकाळी ६:३० वाजता पैठण येथून निघून जामखेड येथे सकाळी १० ते १०:३० वाजेपर्यंत पोहोचत असे.त्यामुळे कुसळंब-पिंपळवंडी-अंमळनेर-कोतन- पांढरवाडी फाटा येथील प्रवासी,जेष्ठ नागरिक,विद्यार्थी,रुग्ण व सामान्य जनतेला मोठा आधार होता.या परिसरातील सामान्य जनतेला जामखेड या ठिकाणी दवाखान्यात तसेच अन्य कामासाठी जावे लागते.

तसेच जामखेड ही मोठी बाजारपेठ असल्याने सतत संपर्क असतो तसेच मोहटादेवी,श्री क्षेत्र पैठण या ठिकाणी जाण्या- येण्यासाठी व तेथून छत्रपती संभाजी नगरला जा-ये करण्यासाठी ही बस सोयीची ठरत होती.ही बस पूर्ववत सुरू करण्यासाठी जामखेड आगार प्रमुखांना अनेक वेळा वर्तमानपत्राच्या माध्यमातून मागणी करून ही काहीच परिणाम झाला नाही.आता राज्य मार्ग परिवहन महामंडळ बीड विभागातील विविध आगारांमध्ये लालपरी (बी.एस ६) नवीन ४५ बसेस लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी दाखल झाल्या आहेत.त्यामध्ये आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नातून पाटोदा व आष्टी आगाराला प्रत्येकी नवीन पाच-पाच बसेस उपलब्ध झाल्या आहेत.त्यामुळे प्रवाशी वर्गातून आमदार सुरेश धस यांचे आभार मानले जात आहे.तसेच आमदार सुरेश धस यांनी अंमळनेर- पिंपळवंडी सह परिसरातील प्रवाशांची बस अभावी होणार हेळसांड थांबविण्यासाठी पाटोदा आगारातून जामखेड ते पैठण लांब पल्ल्याची बस पूर्ववत सुरू करण्यासाठी प्रयत्न करून या परिसरातील सामान्य नागरिकांना आधार द्यावा अशी या परिसरातील सामान्य जनतेकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आमदार धस हे या परिसरातील जेष्ठ नागरिक,विद्यार्थी,रुग्ण,व्यापारी, नागरिक यांची होणारी गैरसोय व हेळसांड थांबविण्यासाठी बसची समस्या निश्चित धसास लावतील यात शंकाच नाही.आमदार सुरेश धस यांच्या एका फोनवर सुद्धा बस सुरू होऊ शकते असा जनतेला विश्वास आहे.ही बस पूर्वीच्या वेळात जामखेड आगारातून दुपारी २:३० वाजता व दुसऱ्या दिवशी पैठण आगारातून सकाळी ६:३० वाजता निघेल अशी वेळ कायम ठेवावी. जामखेड येथे जाण्यासाठी सकाळी ७:३० वाजता शिरूर मुक्कामी जामखेड व सायंकाळी ५ वाजता पाथर्डी-करमळा या बसेस असतात. परंतु,जामखेड येथे जाण्यासाठी प्रवाशांना दिवसभर एकही बस नसल्याने प्रवाशांना खाजगी वाहनातून नाविलाजाने प्रवास करावा लागतो.त्यामुळे जेष्ठ नागरिक,महिला यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे व वेळही वाया जातो.

## वीस कोटीतच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची बोळवण

### वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवारांच्या राजीनाम्याची मागणी



बीड । प्रतिनिधी

अवकाळी पाऊस ,कधी कोरडा तर कधी ओल्या दुष्काळामुळे नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकांचा कर्ज परतफेडीचा तगादा, मालाला हमीभाव नसणं या प्रमुख कारणांमुळे शेतकरी मनोधैर्य खचलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना १ लाख रुपयांची शासकीय मदत दिली जाते. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार १५ दिवसांच्या आत मदत मिळणे बंधनकारक असताना महिनोंमहिने शासनाने निधी उपलब्ध करून न दिल्याने मिळत नाही. वारंवार निवेदने आणि आंदोलने केल्यानंतर सरकारला जाग येते आणि सरकार तुटपुंज्या निधीची तरतूद करते.

दि.१५ मे रोजी संपुर्ण राज्यासाठी केवळ २० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असुन या निधीतून प्रलंबित सर्व शेतकऱ्यांच्या वारसांना मदत मिळणे शक्यच नाही.परीणामी शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीसाठी आणखी प्रतिक्षा करावी लागणार आहे. केवळ २० कोटीतच शासनाने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची बोळवण केल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्त्यांनी दिली वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार हे सोमवार रोजी बीड जिल्हा दौऱ्यावर असुन जिल्हा नियोजन समितीची बैठक प्रशासनातील विविध बाबींचा आढावा घेण्यासाठी येणार असुन शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात येणार असल्याचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर,शेख युनुस, शिवशर्मा शेलार,शेख मुबीन, पांडुरंग हराळे आणि बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, उपाध्यक्ष इंटक संदिप झिंजुर्के यांनी तहसीलदार ( महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय बीड अविनाश शिंगटे यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड यांना दिले आहे.

### विभागीय आयुक्त. वितरीत निधी

| | |
|---|---|
| कोकण | १२ लाख |
| पुणे | १ कोटी ६ लाख |
| नाशिक. | ३ कोटी ३९ लाख |
| छ.संभाजीनगर | ४ कोटी. ९२ लाख |
| अमरावती. | ६ कोटी ७६ लाख |
| नागपूर | ३ कोटी ७५ लाख |

### एकुण २० कोटी निधीची तरतूद

मराठवाड्यात १ जानेवारी २०२५ ते मार्च २०२५ या ३ महिन्यात २६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. यात बीड जिल्हा ७१ ,लातुर १८, धाराशिव ३१, छत्रपती संभाजीनगर ५०, जालना १३, परभणी ३३, हिंगोली ३७ अशा एकुण २६९ शेतकरी आत्महत्यांची नोंद आहे. बीड जिल्ह्यात १ जानेवारी २०२५ ते ३१ एप्रिल २०२५ या ४ महिन्यात ९२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यातील ५५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबिय मदतीच्या प्रतिक्षेत आहेत. दरम्यान छत्रपती संभाजीनगर विभागासाठी केवळ ४.९२ कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे.या विभागात बीडसह ८ जिल्हे येतात.यातुन कोणत्या जिल्ह्याच्या वाट्याला किती येतात?? यातुन सर्व शेतकरी कुटुंबियांना मदत मिळणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.


### जाहीरनामा

**मा.श्रीमती ए.बी. निवारे ९ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ७९४/२०२५**

**विधीज्ञ श्री. बी.एन. तावरे**

**मनिता वि. निरंक**

मागणी:- बॉम्बे रेग्यलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः १) मनिता भ्र. गणेश तांगडे. वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. कळसंबर ता.जि. बीड २) गौरवी पि. गणेश तांगडे, वय०७ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरील प्रमाणे ३) मधुर पि. गणेश तांगडे, वय०३ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरील प्रमाणे अर्जदार क्र. २ व ३ अज्ञान, अ.पा.क. आई अर्जदार क्र. १ ४) कुसुमबाई भ्र. महादेव तांगडे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम. रा. वरील प्रमाणे

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यानी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे ज्याअर्थी मयत नामे गणेश पि. महादेव तांगडे राहणार कळसंबर ता.जि.बीड हे दिनांक १५/०१/२०२५ रोजी जहाँगिर हॉस्पीटल, पुणे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयत नामे गणेश पि. महादेव तांगडे यांची पत्नी, अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी, अर्जदा क्र. ३ हा मयताचा मुलगा व अर्जदार क्र. ४ ही मयताची आई आहे. मयत नामे गणेश पि. महादेव तांगडे यांचे निधन झालेले आहे मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की. जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत गणेश पि. महादेव तांगडे, यांना वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोट घ्यावी

**सदर प्रकरणात पुढील तारीख ०२/०७/२०२५ आहे.**

**आज दिनांक ०९/०५/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले**

स्वाक्षरित **क लिपीक** ९ वे सह दिवाणी न्यायालय व स्तर बीड

शिक्का

आदेशावरून स्वाक्षरित **अधिक्षक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


## लोककल्याण पतसंस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा



युसूफवडगांव। प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील लोककल्याण पतसंस्थेच्या वतीने १० वी व १२ वी गुणवंत विद्यार्थी व स्पर्धा परिक्षांमधील यशस्वी विद्यार्थीखंडेलवा याल गुण-गौरव सोहळा आयोजित करून त्यांचे सत्कार करण्यात आले.

नुकतेच १२ वी व १० वीच्या बोर्ड परिक्षांचे निकाल लागले असुन या परिक्षांमध्ये उत्तुंग यश संपादन करून शाळेचे व गावचे नाव रोषण करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा लोककल्याण पतसंस्थेच्या वतीने गुण-गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता यामध्ये दहावीतील गुणवंत विद्यार्थी समृद्धी शिंदे, साक्षी गुंड, शितल खरबड, हर्षवर्धन रोडगे, मोहिनी चोपणे, दिपीका कवडे, कौस्तुभ जोशी, हर्षवर्धन कोरसळे, सिद्धी थळकरी, .अमृता ढोबळे, हर्षवर्धन नांदे, आदिती रामदासी, सार्थक सपकाळ, निकिता खरबड तर बारावीतील मंजिरी थळकरी, साक्षी पवार, वर्षा थळकरी, सायली वैरागे तसेच विविध स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी वैष्णवी शिंदे, राजनंदिनी रोडगे, भक्ती लामतुरे, राजप्रताप खरबड, अमर थळकरी, सौरभ शेळके, श्रीनिवास खंडेलवाल यांचा देखील पतसंस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी लोककल्याण पतसंस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व संचालक मंडळ व ग्रामस्थ उपस्थित होते.


### जाहीर प्रगटन

**मा. श्री. अ.सं. जगताप, दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १६१/२०२५**

**ॲड. पी.बी. मिसाळ**

**रितु वि. बाबासाहेब**

अर्जदारः १. रितु बाबासाहेब माने विवाहापुर्वीचे नाव सौ. रितु संतोष खिल्लारे विवाहानंतरचे नाव वय-३८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सांगळवाडी पो. रायमोहा ता. शिरूर का. जि. बीड ह. मु. कोतवालवाडी, गणपती मंदिरा जवळ, चऱ्होळी बु. ता. जि. पुणे २. सुभाष बाबासाहेब माने. वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. सांगळवाडी, पो. रायमोहा ता. शिरूर कासार जि. बीड ३. जनाबाई राहुल येडवे वय-२५ वर्षे, धंदा-घरकाम रा. मुर्शदपूर ता.जि. बीड - विरुध्द- १. बाबासाहेब संतराम माने वय ६२ वर्षे, धंदा-शेती, रा. सांगळवाडी पो. रायमोहा ता. शिरूर का. जि. बीड २. अजित बाबासाहेब माने वय ३६ वर्षे, धंदा-शेती, रा. चिंचाचामळा, श्रीराम कॉलनी, मोरेवस्ती, चिखली, पुणे-४१२११४ मो.९७६७०१९७७५ अर्जः बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत..

ज्यापोक्षा मयत लक्ष्मीबाई भ्र. बाबासाहेब माने यांचा मृत्यू दि. २०.०५.२०१६ रोजी सांगळवाडी, पो. राहमोहा, ता. शिरुर कासार, जि. बीड. येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार हे मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १४.०५.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०२.०७.२०२५ ही आहे.

स्वाक्षरित **क लिपीक**

शिक्का

आदेशावरून स्वाक्षरित **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर. शिरूर का.


## नैसर्गिक आपत्ती यंत्रणांनी मान्सूनपुर्व कामे वेळेत पूर्ण करावीत- जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

आगामी मान्सून कालावधीत उद्धवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी सर्व यंत्रणांनी योग्य नियोजन करुन मान्सून पूर्व करावयाची सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित मान्सून पूर्व तयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ बोलत होते. यावेळी बैठकीस प्र. पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश महाडीक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दिपक काजळकर यांची प्रमुख उपस्थी होती.

जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, मागील वर्षीच्या तुलनेत यंदा पर्जन्यमान चांगले राहण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला असून, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांनी परस्पर समन्वय साधून काम करावे. तसेच मान्सुनपूर्व काळात आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांनी सतर्क राहावे. अनुचित घटना टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. कुठे अशी घटना घडल्याचे कळताच तात्काळ मदत पोहोचेल या पध्दतीने नियोजन करावे. घटनेचा पंचनामा तातडीने करुन त्याचा अहवाल प्रशासनाकडे वेळेत सादर करावा, जेणेकरुन वेळेत आर्थिक मदत देणे शक्य होईल. धरणातून पाणी सोडण्यापूर्वी जिल्ह्यातील संबंधित यंत्रणा व नागरिकांना पूर्वसूचना द्यावी. मान्सुन काळात जबाबदारी असलेल्या यंत्रणांनी आपत्तीच्या कामात निष्काजीपणा करु नये. यात दोषी आढळल्यास संबंधिताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायद्यातंर्गत कारवाई करण्यात येईल अशा सूचनाही डॉ. पांचाळ यांनी यावेळी दिल्या.



मान्सुन कालावधीत सर्व यंत्रणा आणि नागरिकांना दामिनी ॲपचा वापर करण्याचे आवाहन करत डॉ. पांचाळ म्हणाले की, मान्सून काळात उद्धवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी संबंधित यंत्रणांच्या विभाग प्रमुखांनी योग्य ती खबरदारी घेवून मान्सून पूर्व कामे वेळेच्या आत पूर्ण करावीत. सर्व संबंधित विभागप्रमुखांनी आपले अधिनस्त अधिकारी, कर्मचारी यांची बैठक घेवून त्यांना योग्य त्या सूचना द्याव्यात. जिल्ह्यातील मोठे व मध्यम तसेच सर्वच प्रकल्पाची तातडीने दुरुस्ती करावी. पावसाळ्याच्या दिवसात संपर्क तुटणाऱ्या गावांना पुरेशा प्रमाणात औषधीसाठा, धान्य पुरवठा करण्यासाठी नियोजन करावे. जिल्ह्यातील गोदावरी, दुधना, केळणा, पुर्णा, गिरजासह इतर लहान-मोठ्या नद्या लक्षात घेता गावांना पुरांचा धोका उद्भवू शकतो.याकरीता नदीकाठावरील गावांत धोकादायक ठिकाणी पुर रेषा आखणीचे काम तात्काळ करावे. जिल्ह्यात संभाव्य पूर प्रवण ४७ गावे आहेत. पूर परिस्थितीमध्ये काय करावे व काय करू नये याची जनजागृती करावी. तसेच आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी सर्व यंत्रणाची आवश्यक साहित्यांची तपासणी करून घ्यावी. २४ तास नियंत्रण कक्षाची स्थापना करुन कक्षातील संपर्क क्रमांक अद्ययावत करावेत. तसेच तालुका स्तरावर देखील २४ तास नियंत्रण कक्ष सुरू करावेत. नगरपालिका, अग्नीशामक, पंचायत, आरोग्य, शिक्षण, पोलीस, कृषी, वाहतूक आदी संबंधीत विभागांनी नियंत्रण कक्ष कार्यान्वित करावेत. हवामान खात्याकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचना सर्वांना तात्काळ पोहचेल याची नियोजन करावे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा अद्ययावत करण्यासाठी प्रत्येक विभागाने आपला आराखडा दि. २० मे, २०२५ पूर्वी सादर करावा. आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने मदतीसाठी निर्माण करण्यात आलेली यंत्रणा आवश्यक त्या साधनांनी अद्ययावत असल्याची खातरजमा करावी.

पावसाळ्यातील संभाव्य साथीचे व जलजन्य आजार नियंत्रणात ठेवण्यासाठी आरोग्य व पशुसंवर्धन विभागाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. आरोग्य विभागाने वैद्यकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना मुख्यालयी उपस्थित राहण्याच्या सूचना द्याव्यात. पावसाळ्यात उत्पन्न होणाऱ्या साथीच्या रोगराईंना थांबविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधी व रक्तसाठा उपलब्ध ठेवावा. आरोग्याच्या सुविधा नागरिकांना वेळेत उपलब्ध होण्यासाठी आरोग्य पथकांची नियुक्ती करावी. नदी काठावरील गावात बचाव पथक, यांत्रिकी बोट, लाईफ जॅकेट, लाईफ रिंग, लाईफ बोयाज पोहणारे व्यक्तींची यादीसह इतर साधन सामुग्रीची उपलब्धता व सुस्थिती तपासुन ठेवावी. पुरपरिस्थितीमध्ये नागरिकांना तात्पुरता निवारा, मुलभुत सुविधा वेळेत उपलबध होण्यासाठी पालिका व तहसील विभागानी सुरक्षीत स्थळांची निवड करता आतापासूनच नियोजन करुन ठेवावे. वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी महावितरणाने पूर्व नियोजन करावे. नागरी भागातील नाल्याची स्वच्छता करुन घ्यावी. तसेच नागरी व ग्रामीण भागातील धोकादायक इमारती व घरांची पाहणी करुन संबंधीतांना पूर्व सूचना देण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी यावेळी दिले. प्रारंभी मान्सून पूर्वतयारीच्या अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक यांनी सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. नागरिकांनी कोणत्याही आपत्तीत जिल्हा नियंत्रण कक्षाचा टोल फ्रि क्र. १०७७ आणि कार्यालयाचा ०२४८२-२२३१३२ या क्रमांकावर मदतीसाठी संपर्क साधण्याचे आवाहन केले. यावेळी पूरस्थितीबाबत पूर्व सूचना, मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प, संभाव्य पूरपरिस्थितीमध्ये बाधित होणारी गावे, तसेच पाण्याचा विसर्ग याबाबतही आढावा घेण्यात आला. यावेळी बैठकीस उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नगरपालिकेचे मुख्याधिकारी, आरोग्य विभाग, पुरवठा विभाग, महावितरण, कृषी, पाटबंधारे, जलसंधारण, बीएसएनएल आदी विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

# अवैध गाळ उपशाच्या टिप्परने उपळी ते धुनकवाड रस्त्याची लागतेय वाट

## या रस्त्यावरुन वाहतुकीस आठ टनापेक्षा जास्त नाही परवानगी, ग्रामस्थ आंदोलनाच्या पावित्र्यात

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील उपळी ते धुनकवाड नं.२ ते हा पंतप्रधान ग्रामसडक योजने अंतर्गत चार किलोमीटरचा रस्ता झाला आहे.परंतु ह्या रस्त्यावरुन सध्या अवैध गाळ उपसा मोठ्या प्रमाणात सुरू असुन या रस्त्यावरून आठ टन पेक्षा जास्त क्षमतेचे वाहन घेऊन जाण्यास मनाई करण्यात आले आहे परंतु तरीसुद्धा या रस्त्यावरून अवैध गाळ उपशाचे वाहन मोठ्या प्रमाणात जात असून हा रस्ता खराब होत आहे व ह्या रस्त्याचे आत्ताच पंधरा दिवसांपुर्वी डांबरीकरण झाले असल्याने हा रस्ता जड वाहने घेऊन जाण्याच्या क्षमतेचा नाही.

उपळी ते धुनकवाड नं.२ हा रस्ता गेल्या तीस वर्षापासून ह्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली होती.परंतु माजी खासदार प्रीतमताई मुंडे यांनी पंतप्रधान ग्रामसडक योजनेमध्ये हा रस्ता घेऊन यासाठी जवळपास चार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला व या रस्त्याला मंजुरी मिळाली व ह्या





### वडवणी व धारुर तहसीलदारांना दिले पत्र पण कारवाई काहीच नाही

रस्त्याचे काम ही प्रगतीपथावर आहे.परंतु हा रस्ता टिकाऊ होण्यासाठी व टिकाऊ राहण्यासाठी या रस्त्यावर ओव्हरलोड पद्धतीने जे की अवैध गाळ वाहतूक होत आहे यामुळे हा रस्ता खराब होऊन पुन्हा तेच दिवसं या भागातील लोकांना बघायला मिळणार यामुळे या रस्त्यावरील अवैध गाळ उपसा बंद करून प्रशासनाने या टिप्परवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांतुन होत आहे.

### आठ टनापेक्षा जास्त वजनाच्या वाहनाला वाहतुकीसाठी परवानगी देऊ नये

प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत ५४८ ते धुनकवाड नं.१-धुनकवाड नं.२-उपळी रस्ता ता. वडवणी/धारूर साई कन्स्ट्रक्शन कंपनी मार्फत प्रगतीपथावर आहे.सदर रस्त्याचे डांबरी काम पुर्ण झाले आहे हा रस्ता ग्रामीण रस्ता असून या रस्त्याची वजन सहन करण्याची क्षमता आठ टन आहे.तरी जास्त वजनाचे वाहन (टिपर) वाहतुक झाली तर रस्ता खरब होण्याची शक्यता आहे तरी प्रशासनाने याची दखल घ्यावी असे पत्र महाराष्ट्र ग्रामीण विकास यंत्रणा या कार्यालयानी धारूर व वडवणी तहसीलदारांना दिले आहे.

### ग्रामस्थ आंदोलन करण्याच्या पावित्र्यात

गेल्या अनेक वर्षापासून ह्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली होती परंतु ह्या रस्त्यासाठी निधी मंजूर करून हा रस्ता करण्यात आला आहे.तरी या रस्त्यावरून अवैध गाळ उपशाचे टिप्पर मोठ्या प्रमाणात चालत असून हा रस्ता लवकरच खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून जर प्रशासनानं हा अवैध गाळ उपशाचे टिप्पर बंद नाही केले तर उपळी व धुनकवाड नं.२ येथील ग्रामस्थ आंदोलन करण्याच्या पावित्र्यात आहेत.

# माजी सैनिकांचा सन्मान करुन रणवीर पंडित यांचा वाढदिवस साजरा होणार

## रक्तदान शिबीरासह विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन

गेवराई । प्रतिनिधी

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय सैन्य दलातुन निवृत्त झालेल्या माजी सैनिकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. माजी सैनिकांचा सन्मान करुन रणवीर पंडित यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा होणार असल्यामुळे तरुणांमध्ये या निमित्ताने राष्ट्रप्रेम जागृत करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शनिवार दि. १७ मे रोजी सकाळी ११ वाजता गेवराई शहरातील कृष्णाई निवासस्थानी



मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी निवृत सुभेदार कॅप्टन रामकृष्ण चेडे, डॉ. मयुर सोनवणे, बळीराम गवते, अजिंक्य आनेराव यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रक्तदान शिबीर, पेढे तुला, सामान्य ज्ञान स्पर्धा आदी समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी युवकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीच्या माध्यमातुन करण्यात आले आहे.

गेवराई तालुक्यातील माजी सैनिकांचा भव्य सन्मान करुन शारदा ◀◀ पान ३ वर

# प्रभू श्रीरामाच्या जमिनीचा श्वास मोकळा करण्यासाठी पंचकुंडात्मक श्रीराम महायज्ञ सोहळा

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील श्रीराम देवस्थानच्या जमिनीचा श्वास मोकळा व्हावा, यासाठी पंच कुंडात्मक श्रीराम महायज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमात चकलांबा परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



गेवराई तालुक्यातील चकलांबा महत्वाचे आणि सर्कलचे गाव आहे. या गावामध्ये प्रभू श्रीराम देवस्थानची गट. नं ५७१ व गट नं. ५७६ मधील ४८ एकर २९ गुंठे जमीन आहे. सदरील जमिनीवर अधिकृत ताबा मिळवण्यासाठी गावातील काही लोकांनी प्रयत्न सुरू केला आहे. तसेच श्रीराम देवस्थानच्या नावाने बोगस ट्रस्ट करून आपणच सचिव असल्याचे सांगून खाजगी ठेकेदाराला गट नंबर ५७६ मधील ११ एकर जमीन भाड्याने देण्यात आली आहे. श्रीराम देवस्थानच्या जमिनीचा बेकायदेशीर करार करणाऱ्या दोषी लोकांवर कारवाई व्हावी. तसेच देवस्थानच्या नावावरील जमिनीचा गेल्या १० वर्षापासून पिकविमा उचलणाऱ्या व लाभ घेणाऱ्या दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी. सदरील जमिनीवरील बेकायदेशीर हस्तांतर खोटे कागदपत्रे, खोटे करारनामे व बोगस पिकविमा उचलणाऱ्या कारवाई होऊन श्रीराम देवस्थानच्या जमिनीचा श्वास मोकळा व्हावा, यासाठी श्रीकृष्ण भिमराव खेडकर व सकल हिंदू समाज, राम भक्त मंडळी, चकलांबा परिसर यांनी भव्य दिव्य पंचकुंडात्मक श्रीराम महायज्ञ सोहळा आयोजित केला आहे. सर्व नागरिक व रामभक्तांनी शुक्रवार दि. १६ ते १७ मे २०२५ रोजी आयोजित कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

# भाजपा मंत्री विजय शहावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा - गणेश बजगुडे पाटील

बीड । प्रतिनिधी

ज्या पाकिस्तानी अतिरेक्यांनी काश्मिरच्या पहेलगाम भागात निष्पाप भारतीयांवर हल्ला केला त्यात अनेक निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमावावा लागला. त्याचा बदला म्हणून भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंधूर राबवत कर्नल सोफिया कुरैशी व पायलट व्योमिका सिंह यांनी पाकिस्तानातील दहशतवाद्यादी तळावर हवाई हल्ले करून दहशतवाद्यांचे समुळ नष्ट केले. अशा जाबाज सैनिकांच्या पराक्रम, शौर्याचे संपुर्ण भारतवासी कौतुक करत असताना मध्ये प्रदेश सरकार मधील भाजपा मंत्री विजय शहा यांनी आम्ही अतिरेक्यांना मारायला त्यांचीच बहिण पाठवली म्हणत अतिशय बेताल व संतापजनक वक्तव्य करून भारतीय सैनिकांचा अवमान केलेला आहे.



कर्नल सोफिया कुरेशी या भारतीय असुन तमाम भारतीयांच्या त्या बहीण आहेत. परंतु त्या मुस्लिम आहेत म्हणुन त्यांना आतंकवादयाची बहीण म्हणणे हे अतिशय निंदनीय व खेदजनक आहे. या वक्तव्याचा बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत अश्याप्रकरे बेताल वक्तव्य करणाऱ्या भाजपा मंत्री विजय शहावर देश द्रोहाचा गुन्हा दाखल करुन मंत्री मंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी काँग्रेसचे नेते तथा शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष गणेश दादा बजगुडे यांनी केले आहे.

# अंकेत ढवळे याचे दहावीत ९६ टक्के गुण घेत घवघवीत यश

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील जुजगव्हाण येथील रहिवाशी अंकेत प्रकाश ढवळे या विद्यार्थ्याने लातूर येथून परीक्षा देत दहावी मध्ये ९६.२०% गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



नुकताच इयत्ता दहावीचा निकाल लागला असून, यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी विशेष यश मिळवत आपले नाव उज्वल केले आहे. बीड तालुक्यातील जूजगव्हाण येथील मूळ रहिवासी असलेले प्रकाश ढवळे हे लातूर येथे स्थायिक आहेत. त्यांचा मुलगा चिरंजीव अंकेत याने लातूर येथील मनोज सहदेव अकॅडमी मार्फत इयत्ता दहावीची परीक्षा दिली होती. नुकताच याचा निकाल लागला असून, या परीक्षमध्ये अंकेत ढवळे याने ९६.२०% असे गुण मिळवीत घवघवीत यश संपादन केले. यामध्ये सर्वच विषयाला ९० पेक्षा अधिक गुण असून, संस्कृत विषयात पैकीच्या पैकी मार्क्स पडले आहेत. अंकेत याने संपादन केलेल्या या यशाबद्दल जूजगव्हाण, ढेकनमोहा आणि लातूर येथील आप्तेष्ट आणि मित्र मंडळाने त्याचे अभिनंदन केले आहे. अंकेत ढवळे हा प्रसिद्ध व्यावसायिक शंकर ढवळे यांचा पुतण्या आहे.

# मानवलोक -जनसहयोगच्या वतीने शंभर किराणा सामान किटचे वाटप

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मानवलोक जन सहयोगच्या वतीन शंभर किराणा किटचे वाटप शुक्रवारी दुपारी करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी माजी मुख्यध्यापक ज्ञानोबा हनुमंत कुकडे, रोटरीचे माजी अध्यक्ष भागवत कांबळे उपस्थित होते.

ज्ञानोबा कुकडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की आजच्या या किराणा वाटपाचा कार्यक्रमासाठी बोलावले हे मी माझे भाग्य समजतो आणि मला फुल नाही फुलाची पाकळी देण्याची संधी मिळाली.समोर बसलेले माता आणि




पित्रतुल्य आहेत त्यांच्यामध्ये मी माझ्या आई आणि वडिलाला पाहत आहे. तुमच्या चेहऱ्यावर जो आनंद मी पाहत आहे त्याच्या पाठीमागे मानवलोक संस्था उभी आहे तुम्ही निराधार नाहीत तुम्हाला तुमच्याच मुलांनी निराधार केले आहेत. तुम्ही मुलांना लहानाचे मोठे केले त्यांच्या पायावर उभा केले तुमचे कर्तव्य तुम्ही केले परंतु मुलांनी जे करायला पाहिजे होते ते केले नाही म्हणून तुम्ही निराधार ◀◀ पान ३ वर

# गोदावरी व सिंधफना नदीपात्र व बंधाऱ्यात पाणी सोडण्यासाठी प्रशासनाची मंजुरी- आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

मतदारसंघातील गोदावरी, सिंधफाना व कुंडलीका नदीपात्रात पाणी सोडण्याबाबत माजलगाव मतदारसंघातील अनेक गावांमधून मागणी करण्यात आली होती,त्या अनुषंगाने सदर पाणी सोडण्याबाबतचे प्रस्ताव पाटबंधारे विभागाकडे सादर करण्यात आले होते.त्यानुसार नदीपात्रात व बंधाऱ्यात पाणी सोडण्यासाठी प्रशासनाकडून मंजुरी मिळाली असल्याची




माहिती आ.प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.

मतदारसंघातील गोदावरी,सिंधफाना व कुंडलीका नदीपात्रात व बंधाऱ्यात पाणी सोडण्याबाबत माजलगाव मतदारसंघातील अनेक गावांमधून मागणी करण्यात आली होती,त्या अनुषंगाने सदर पाणी सोडण्याबाबतचे प्रस्ताव पाटबंधारे विभागाकडे सादर करण्यात आले होते.त्यानुसार नदीपात्रात व बंधाऱ्यात पाणी सोडण्यासाठी ◀◀ पान ३ वर

# कासारी येथे बैलगाडा शर्यतीचा थरार

## जालन्याच्या पक्षा-पिस्टन बैलजोडीने मैदान मारले



दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील कासारी येथे युवानेते भागवत दराडे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय बैलगाडा शर्यत बुधवारी पार पडली. हजारो शौकिनांच्या उपस्थितीत जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील धाकलगाव येथील शेतकरी चंद्रकांत खोमने व प्रताप नाझरकर यांच्या पक्षा-पिस्टन बैलजोडीने रोमांचकारी विजय मिळवत उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. ५१ हजार रुपये रोख बक्षीस देत बैलगाडा मालकाचा सन्मान करण्यात आला.

कासारी येथे मागील तिन वर्षांपासून जैतापूर सरपंच भागवत दराडे यांच्या वाढदिवस निमित्ताने बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात येते. बुधवारी आयोजित बैलगाडा शर्यतीचे उद्घाटन माजी सरपंच शामसुंदर बडे, सदाशिव बडे, मनोहर बडे, जमरी सय्यद, प्रशांत बडे, अंकुश बडे यांच्या हस्ते करण्यात आले. १४५ बैलगाडा मालकांनी राज्यभरातून कासारी येथे दाखल होत शर्यतीत सहभाग नोंदवला. आठ राऊंड मध्ये प्रथम व द्वितीय येणाऱ्या बैलगाड्यांची उपांत्य फेरी घेण्यात आली. चार उपांत्य फेरीत विजय मिळवणाऱ्या आठ बैलजोड्यांचा अंतिम सामना खेळविण्यात आला. डोक्यावर प्रचंड उन तळपत असताना सुद्धा हजारो प्रेक्षकांनी मैदानाच्या दुतर्फा गर्दी केली होती. कोणत्याही बैलगाडा मालकावर अन्याय होऊ नये म्हणून ◀◀ पान ३ वर

# नागनाथ विद्यालयाची दहावीच्या निकालाची उज्वल परंपरा कायम

**बीड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील मोरगांव येथील नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ९४.८७% इतका लागला असून यावर्षी पण उज्वल निकालाची परंपरा या शाळेने कायम राखली आहे.**



महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे ११७ पैकी १११ विद्यार्थी उत्तीर्ण होवून विशेष प्राविण्यात ८२, प्रथम श्रेणीत २४, द्वितीय श्रेणीत ०२ तर तृतीय श्रेणीत ०३ विद्यार्थी उत्तीर्ण होवून शाळेचा शेकडा निकाल ९४.८७% एवढा लागला यात गुणानुक्रमे प्रथम कु.टाकळे तेजस्वी संतोष ९६.६०%, द्वितीय कु.भड काजल केशव ९६.२०%, तृतीय चि.दुधाळ अभिषेक दत्तात्रय ९५.६०% गुण मिळवून उत्तीर्ण झाले. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, कार्यालयीन अधिक्षक प्रकाश राठोड, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य डी.बी. माटे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# प्रेरणा कैलास पवारने दहावी बोर्ड परीक्षेत १०० टक्के मिळवून पटकावले अव्वल स्थान

अंमळनेर । प्रतिनिधी

अंमळनेर येथील रहिवासी असणाऱ्या कु. प्रेरणा कैलास पवार हिने एस. एस.सी. बोर्ड परीक्षा २०२५ मध्ये १०० टक्के गुण प्राप्त करून लातूरच्या श्री.देशिकेंद्र विद्यालयामध्ये अव्वल स्थान पटकावले आहे.तिचे वडील हे जि.प.शिक्षक आहेत तर आई गृहिणी आहे. कु. प्रेरणा पवारने तिचे संपूर्ण शालेय शिक्षण जि.प. केंद्र कन्या प्राथमिक शाळा अंमळनेर,जि. प. प्राथमिक शाळा जरेवाडी, जवाहर नवोदय विद्यालय गढी आणि श्री देशिकेंद्र विद्यालय, लातूर या चार ठिकाणच्या नावाजलेल्या शाळांमधून पूर्ण केले आहे.



तिच्या या यशामध्ये या सर्व शाळांमधील शिक्षकांच्या अनमोल मार्गदर्शनाचा सिंहाचा वाटा आहे. तिने सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या बळावर प्राप्त केलेल्या या धवल यशाबद्दल तिचे आणि तिच्या परिवाराचे अंमळनेर पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

# संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालय दहावीचा १००% निकाल

**कळंब । प्रतिनिधी**

धाराशिव जिल्ह्यात मुकबधिर प्रवर्गातून प्रथम क्रमांक मिळवत,तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगांव संचलित संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालय कळंब जि.धाराशिव येथील इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला आहे.विशेष प्राविण्य ०२, प्रथम श्रेणीत ०६, द्वितीय श्रेणीमध्ये ०१असून निकाल पुढील प्रमाणे आहे.लखन व्यंकट अवधूते - ७५.६०% प्रथम, कु.स्नेहा समाधान कोळी - ७५.२०% द्वितीय, गणेश सुधाकर वनवे - ७१.६०% तृतीय, विष्णू श्रीहरी वायबसे - ६९. ८०% , जयराम व्यंकट अवधूते- ६०.८० %, सुरज प्रताप वाघमारे -६९.६०%,



कु.तेजस्विनी प्रदीप चवरे- ६८.०० %, सुमित शिवाजी इंगळे- ६४. ६० %, कृष्णा महादेव शिंदे - ५७. ६०%, या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तुळजाई प्रतिष्ठानचे सचिव सन्माननीय श्री.शहाजी चव्हाण साहेब व शाळेचे मुख्याध्यापक श्री. बालाजी जाधवर सर, विशेष शिक्षक आश्रुबा कोठावळे, श्रीमती गुंड सुनीता, श्रीमती सुनंदा गायकवाड, गणेश फरताडे तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# जमीन हडपण्यासाठी 'नकली महिला'ची स्कीम! वाघोलीतील चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**वाघोली । प्रतिनिधी**

वाघोली येथील १० एकर जमिनीबाबत बनावट महिला उभी करुन ती जमिनीची मुळ मालक असल्याचे भासवून खरेदीखत तयार करणार्या चौघांवर चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये चंदननगर पोलीस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षकांचाही सहभाग आहे.

आनंद लालासाहेब भगत (रा. वाडेगाव), शैलेश सदाशिव ठोंबरे (रा. हडपसर), चंदननगर पोलीस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र लांडगे आणि अपर्णा यशपाल वर्मा ऊर्फ अर्चना पटेकर (रा. इस्लामपूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्वाती खेडकर यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार २०२२ ते १७ मे २०२३ दरम्यान




घडला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, वाघोली येथील १० एकर जमीन हडपण्याच्या उद्देशाने संगनमत करुन हवेली सह दुय्यम निबंधक कार्यालयात अर्चना पटेकर या महिलेला अपर्णा यशपाल वर्मा असे नाव धारण करायला सांगून तीच मुळ जागा मालक आहे, हे भासविले.

अपर्णा वर्मा या नावाचे बनावट दस्त नोंदणीसाठी खोटे, बनावट आधार कार्ड, पॅन कार्ड तयार करुन जमिनीचे खरेदीखताचे दस्त तयार केले. हा प्रकार समोर आल्यानंतर पोलिसांनी त्याबाबत चौकशी केली. त्यात बनावट कागदपत्रे तयार करण्यात या चौघांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. यांचा चंदननगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा ढाकणे अधिक तपास करीत आहेत.

यापूर्वीही जागा बळकाविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

बनावट अधिकारपत्राद्वारे वाघोलीतील १० एकर जागा बळकाविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी महिलेसह तिघांवर यापूर्वीही २०२१ मध्ये लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तिघांनी बनावट अधिकारपत्र नोटराईजकरून एका व्यक्तीस दिले होते. त्यावेळीही अपर्णा वर्मा व संबंधित व्यक्तीची पाच लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# फॉर्च्युनरच्या राँग साइड धडकेत दुचाकीस्वार वकिलाचा दुर्दैवी अंत; पुणे-पानशेत रस्त्यावरील घटना

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या वर्षी पुण्यातील कल्याणीगर भागात एका भरधाव पोर्शे कारने संगणक अभियंता तरुण-तरुणीला धडक दिल्याची घटना घडली होती. या अपघातात दोघांचाही मृत्यू झाला होता. या घटनेनंतर आता पानशेत ते पुणे रस्त्यावर मनेरवाडी येथे एका भरधाव वेगाने आलेल्या फॉर्च्युनर कारने राँग साईडने येत दिलेल्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

या अपघाताच्या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्याचे नाव अनिकेत अरुण भालेराव (३५, रा. वरदाडे, ता. हवेली, जि. पुणे) असे असून ते पेशाने वकील होते. ही घटना बुधवारी १४ मे रोजी संध्याकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली आहे. दरम्यान,



दुचाकीस्वाराला उडवल्यानंतर फॉर्च्युनरमधील चालक आणि एक युवती हे घटनास्थळावरून पसार झाले. याप्रकरणी मयत अनिकेत अरुण भालेराव यांचे काका शांताराम गोपाळ भालेराव (वय ५२) यांनी हवेली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

या प्रकरणी हवेली पोलिसांनी फॉर्च्युनर (एमएच १४ ई ए ००५१) च्या चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. शांताराम भालेराव यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, अनिकेत भालेराव हे शिवाजीनगर न्यायालयात वकिली करत होते. बुधवारी संध्याकाळी चारच्या सुमारास ते भाजीपाला आणण्यासाठी खानापूर येथे गेले होते.

पानशेत ते पुणे रस्त्यावरील तारांगण हॉटेलसमोरून जात असताना समोरून आलेल्या फॉर्च्युनरने त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात अनिकेत गंभीर जखमी झाले होते. त्यांना जखमी अवस्थेत खानापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्यानुसार शहरातील एका खाजगी रुग्णालयात नेण्यात आले. तिथे गेल्यावर डॉक्टारांनी अनिकेत याला मृत घोषित केले.

दरम्यान, प्रत्यक्षदर्शी आणि अनिकेत यांच्या नातेवाईकांनी बोलताना फॉर्च्युनर कारचा चालक राज चोरघे नामक व्यक्ती असल्याची माहिती दिली आहे. तसेच अपघातावेळी तो मंद्यधुंद अवस्थेत असल्याचा दावा नातेवाईकांनी केला आहे. तसेच कल्याणीनगर भागातील अपघात प्रकरणात पोलिसांनी ज्या प्रकारे कारवाई केली. तशीच कारवाई या अपघात प्रकरणात करण्यात यावी, अशी मागणी मयत अनिकेत भालेराव यांच्या नातेवाईकांकडून करण्यात आली आहे. या अपघाता प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# सोमेश्वर कारखान्याच्या टाईम ऑफिसमधील अपहार प्रकरण : अपहारकर्त्याकडून ५५ लाखांची वसुली

**सोमेश्वरनगर । प्रतिनिधी**

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या टाईम ऑफिसमध्ये अपहार झाल्याचे कारखान्याने स्थापन केलेल्या चौकशी समितीत निष्पन्न झाले होते. अपहार करणाऱ्या रूपचंद साळुंखे या कर्मचाऱ्याकडून अपहार व कर अशी मिळून ५४ लाख ४७ हजार रुपयांची वसुली करण्यात यश मिळवले आहे. कारखान्याने स्थापन केलेल्या चौकशी समितीकडून व संचालक मंडळाकडून दोषींवर काय कारवाई होणार याकडे सभासदांचे लक्ष लागले आहे.



रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या नावापुढे बोगस हजेरी दाखवून त्याचे पैसे उकळण्याचा प्रकार टाईम ऑफिसमध्ये घडला होता. यानंतर कारखान्याच्या संचालक मंडळाने टाईम ऑफिसचे अधिकारी व कामगार असे सहा जण आणि एक कंत्राटदार या सर्वांना एकाच वेळी निलंबित करत त्यांची चौकशी करण्याचा निर्णय घेतला होता.

साखर आयुक्तालयाच्या पॅनेलवरील मेहता-शहा चार्टर्ड अकौटंट कंपनीने डिसेंबर २०१७ ते जानेवारी २०२५ या आठ वर्षे कालावधीतील कारभाराची तपासणी केली. यामध्ये ५४ लाख २९ हजार रुपयांचा अपहार झाल्याचे निश्चित झाले होते. दरम्यान, विधिज्ञ ड. मिलिंद पवार यांच्या समितीने कर्तव्यात कुचराई केल्याचा ठपका कामगार अधिकारी दीपक निंबाळकर यांच्यावर तर अपहाराचा ठपका रूपचंद साळुंखे याच्यावर ठेवला होता.

दरम्यान विलास निकम, दीपक भोसले, सुरेश होळकर, श्री. बनकर हे चौघे कामगार व कंत्राटदार शशिकांत जगताप यांनी कुठलाही अपहार केला नसल्याचे निष्पन्न झाले होते. सहकार कायद्यान्वये कायदेशीर कारवाईसाठी व वसुलीसाठी ड. मंगेश चव्हाण यांची समिती नियुक्त केली होती. या समितीने सर्वांना म्हणणे मांडण्याची संधी देत रूपचंद साळुंखे याच्याकडून टप्प्याटप्प्याने अपहाराची रक्कम भरून घेण्यात यश मिळविले आहे. रकमांची वसुली केल्याचे सभासदांमधून स्वागत होत आहे; मात्र आता साळुंखे व निंबाळकर यांच्यावर समिती निलंबनाची कारवाई करणार की गुन्हे दाखल करणार याकडे सभासदांचे लक्ष लागले आहे. तसेच निर्दोष असलेले निकम, भोसले, होळकर, बनकर यांना न्याय कधी मिळणार याचीही चर्चा होत आहे.

# भूमिअभिलेख कर्मचाऱ्यांचे बेमुदत काम बंद

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील भूमिअभिलेख कर्मचाऱ्यांचा गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला तांत्रिक वेतनश्रेणीचा प्रश्न सोडविण्यात शासनाकडून होत असलेल्या दिरंगाईच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य भूमिअभिलेख कर्मचारी संघटना पुणे विभाग या संघटनेने गुरुवारपासून (दि.१५) बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. त्यामुळे भूमिअभिलेखच्या पुणे विभागातील सर्वच कार्यालयांचे कामकाज ठप्प झाले आहे.

दरम्यान, पुण्यातील भूमिअभिलेख कार्यालयाच्या बाहेर आंदोलनाने जोर धरला आहे. त्यामुळे परिसर आंदोलकांच्या घोषणांनी दुमदुमून गेला आहे.

दरम्यान, या आंदोलनास राज्यातील भूमिअभिलेखच्या सर्व संघटनांनी पाठिंबा दिला आहे, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष विजय मिसाळ, सरचिटणीस अजित लांडे, धनाजी बाबर, कार्याध्यक्ष सुधीर पाटील यांनी दिली आहे.

# 'स्किल स्कूल' अंतर्गत विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण

**पुणे । प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षणाबरोबरच त्यांना अधिकाधिक रोजगारक्षम बनविण्यासाठी कौशल्याधिष्ठित प्रशिक्षण देणे, ही काळाची गरज आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी सकाळ माध्यम समूहातील 'सकाळ सोशल फाउंडेशन' व पुण्यातील 'श्री मुकुंद भवन ट्रस्ट' यांच्यातर्फे आणि चैतन्य सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजीज यांच्या सहकार्याने 'सकाळ एनआयई' (न्यूज पेपर इन एज्युकेशन) उपक्रमाच्या ग्रामीण भागातील दहा सभासद शाळांमध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून कौशल्याधिष्टित प्रशिक्षणाचा 'स्किल स्कूल' प्रकल्प राबविण्यात येत आहे.

'स्किल स्कूल' प्रकल्पाची औपचारिक घोषणा पुण्यातील 'सकाळ' मुख्य कार्यालयात नुकतीच झाली. यावेळी 'सकाळ'च्या संचालिका मृणाल पवार, 'श्री मुकुंद भवन ट्रस्ट'चे कार्यकारी विश्वस्त पुरुषोत्तम लोहिया, मदन जैन, 'सकाळ सोशल फाउंडेशन'चे विश्वस्त महेंद्र पिसाळ, शरद सारडा, आंबेगाव तालुका पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी जीवन कोकणे, शिक्षक ज्ञानेश्वर निमोणकर, प्रल्हाद चौधरी, अभिमन्यू भुजबळ, गोरक्षनाथ केदारी आदी उपस्थित होते.

'स्किल स्कूल'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील शाळांमधील पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पंधरा विविध रोजगाराभिमुख कौशल्यांचे प्राथमिक स्तरावरील प्रात्यक्षिक स्वरूपात कार्यशाळांद्वारे वर्षभर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक शाळेला पंधरा कौशल्यांचे वेगवेगळे 'टूल्स किट' दिले जाणार असून, सुरुवातीला या उपक्रमाद्वारे काही विद्यार्थ्यांना विविध तुकड्यांमधून प्रशिक्षित करून नंतर इतर विद्यार्थ्यांना प्रशिक्षित विद्यार्थ्यांद्वारे शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण दिले जाणार आहे. वर्षाच्या शेवटी दहा शाळांमध्ये स्पर्धा आयोजित करून यशस्वी विद्यार्थ्यांच्या गटांचा आणि विजेत्या शाळांचा सन्मान करण्यात येणार आहे.

ही असणार पंधरा कौशल्ये

इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, बेसिक कॉम्प्यूटर (वर्ड, एक्सेल आणि पॉवरपॉइंट), रोबोटिक्स (ड्रॉइंग रोबोट, वॉकिंग रोबोट व मून रोव्हर), ड्रोन निर्मिती (बेसिक), आर्टिफिशियल ज्वेलरी, फॅब्रिक ज्वेलरी, ब्युटी पार्लर, कारपेंटरी, प्लंबिंग, गार्डनिंग, रांगोळी, मेहंदी, कुकिंग (बेसिक), ॲलेक्सा डॉल मार्फत इंग्रजी व हिंदी भाषेचे प्रशिक्षण.

# टोरंट गॅसला नियमभंगाचा झटका! शिरूर नगरपरिषदेने ठोठावला २५ हजारांचा दंड

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर शहरातील कल्याणी भेळ समोरील नगरपरिषदेच्या मालकीच्या जागेत परवानगी शिवाय मशिनरी साहित्य ठेवणाऱ्या टोरंट गॅस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीवर शिरूर नगरपरिषदेने २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. ही माहिती मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष महिबूब सय्यद यांनी दिली.

सदर प्रकरणात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने नगरपालिकेकडे तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्थळ पाहणी केली. पाहणी दरम्यान कल्याणी भेळ समोरील नगरपरिषदेच्या जागेत कोणतीही अधिकृत परवानगी न घेता टोरंट गॅस कंपनीने मशिनरी साहित्य ठेवले असल्याचे स्पष्ट झाले.


टोरंट गॅस प्रा. लि. ही कंपनी सध्या शिरूर शहरात भूमिगत गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम करत आहे. या कामासाठी खोदकामाची परवानगी नगरपरिषदेकडून मिळालेली असली, तरी मशिनरी साहित्य ठेवण्यासाठी स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक होते.

मात्र, कंपनीने ती न घेता थेट सरकारी जागेचा वापर केल्याने ही कारवाई करण्यात आली. पालिकेने कंपनीला ४८ तासांच्या आत खुलासा देण्याची नोटीस दिली होती. मात्र, संबंधित वेळेत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने पालिकेने कठोर पावले उचलत २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

# पुण्यात पुन्हा कोयता गँगचा थरार, भररस्त्यात तरुणावर टोळक्याचा हल्ला: जीव वाचवत पळतानाचा व्हिडीओ समोर

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात दिवसेंदिवस वाढत चाललेली गुन्हेगारी ही पोलिसांसाठी मोठं आव्हान ठरत आहे. मागील काही वर्षांपासून शहरात गुन्ह्यांचं प्रमाण झपाट्याने वाढलं असून, भरदिवसा रस्त्यावर होणारे हल्ले, खून आणि दहशतीच्या घटना थांबण्याचं नाव घेत नाहीयेत. अशातच आता दत्तवाडी परिसरात आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. कोयता गँगने एका तरुणावर भररस्त्यात हल्ला केल्याची घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. या हल्ल्यामुळे परिसरात भीतीचं वातावरण पसरलं असून, स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पुण्यात सुरू असलेल्या या कोयता गँगच्या दहशतीला लगाम घालण्यासाठी पोलीस यंत्रणेसमोर मोठं आव्हान उभं ठाकलं आहे. या हल्ल्याचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. तीन ते चार जणांनी मिळून



एका तरूणावर कोयता घेऊन हल्ला केला.

या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील दत्तवाडी परिसरातील भररस्त्यात तीन ते चार जणांनी एका तरुणाच्या मागे कोयत्यासह इतर धारदार हत्यारे घेऊन धावत होते. टोळक्यापासून वाचण्यासाठी तो तरुण जीवाच्या आकांताने वाट दिसेल तिकडे धावत होता. मात्र रस्त्यावरच्या वळणावर त्याचा तोल गेला आणि तो काही क्षणांसाठी खाली कोसळला. तितक्यात पाठीमागून हातात धारदार कोयता घेऊन आलेल्या एकाने त्याच्यावर वार केला. त्यापाठोपाठ टोळीतील इतर तरुणही आले आणि त्यांनीही त्या तरुणावर हल्ला चढवला. हा सगळा प्रकार जवळच्या सीसीटीव्हीत कैद झाला आहे. त्यावेळी दुचाकीवरून त्या तरूणाचा पाठलाग करणारा तरूण त्याच्या इतर साथीदारांना अरे धर, धर त्याला, पकड त्याला असं मोठ्याने ओरडत असल्याचंही दिसून येतं आहे. दत्तवाडीमध्ये पूर्ववैमस्यातून तीन ते चार जणांनी हा हल्ला केला. हातात कोयता घेऊन दहशत पसरवण्याचा प्रयत्न केला आहे.

या भरदिवसा झालेल्या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर शहरातील रुग्णालयात आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. त्याच्यावरती उपचार सुरू आहेत. दरम्यान, पूर्ववैमनस्यातून हा हल्ला करण्यात आल्याची माहिती असून दत्तवाडी पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे. त्याचबरोबर पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे हल्लेखोरांचे शोध घेतला जात आहे. मात्र, वारंवार होत असलेल्या या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. पुण्यात सुरू असलेल्या या कोयता गँगच्या दहशतीला लगाम घालण्यासाठी पोलीस यंत्रणेसमोर मोठं आव्हान उभं ठाकलं आहे. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही मध्ये कैद झाला आहे. परिसरात दहशतीचं वातावरण निर्माण झालं आहे. दत्तवाडी पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू आहे.

# पुण्यातील मानाचा चौथा गणपती श्री तुळशीबाग महागणपतीला १५०० कलिंगडांचा नैवेद्य

**पुणे । प्रतिनिधी**

रंगीबेरंगी फुलांची आकर्षक आरास चंदन उटीचे लेपन आणि तब्बल १ हजार ५०० कलिंगडांचा नैवेद्य श्री तुळशीबाग महागणपतीला दाखविण्यात आला. शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षात (१२५) संकष्टी चतुर्थीच्या दिवशी बाप्पासमोर साकारलेला कलिंगडांचा नैवेद्य व पुष आरास पाहण्याकरिता गणेशभक्तांनी मोठी गर्दी केली.



मानाचा चौथा गणपती श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट च्या वतीने कलिंगडाचा महानैवेद्य व वासंतीक चंदन उटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंडळाचे अध्यक्ष विकास पवार, कोषाध्यक्ष नितीन पंडित, उपाध्यक्ष विनायक कदम, दत्ताभाऊ कावरे, गणेश रामलिंग आणि परिसरातील व्यापारी उपस्थित होते. प्रसिद्ध पुष्प सजावटकार सुभाष सरपाले यांनी ही आरास साकारली.

संकष्टी चतुर्थी च्या दिवशी वासंतिक चंदन उटी लेपन करण्यात आले. तसेच रात्री गणेश जागर आणि महाआरती चे आयोजन करण्यात आले होते. शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त मंडळातर्फे विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# जादा परताव्याच्या अमिषाने १ कोटी ५० लाखांची फसवणूक

**बारामती । प्रतिनिधी**

विविध कारनाम्यांमुळे गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आलेल्या विद्यानंद ग्रो फीड्स लि. च्या आनंद सतीश लोखंडे (रा. विद्यानंद हाऊस जळोची, बारामती) याच्यावर अखेर बारामती तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. ग्रो फार्ममध्ये गुंतवणूक केल्यास दरमहा २० टक्के इन्सेन्टीव्ह देवू, असे अमिष दाखवून १ कोटी ५० लाखांची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी आकाश उर्फ सुयोग कुंडलिक भिसे (रा. काटेवाडी, ता. बारामती) यांनी फिर्याद दिली.




फिर्यादी आकाश भिसे व अजय शिवाजी ओमासे (रा. एमआयडीसी) हे दोघे एकमेकांचे मित्र आहेत. सन २०२४ मध्ये अजय याने आकाशची ओळख लोखंडे याच्याशी करून दिली. लोखंडे याने या दोघांना विद्यानंद फिड्स ग्रो लि. मध्ये तुम्ही रोख स्वरुपात पैसे गुंतवा, मी तुम्हाला गुंतवलेल्या रकमेवर दरमहा १० तारखेला २० टक्के इन्सेन्टीव्ह देईन असे सांगितले. त्याच्यावर विश्वास ठेवून आकाशने दोन लाख रुपये तर ओमासे यांनी मित्र व नातेवाईकांकडून १ कोटी ४८ लाख रुपये घेत ती रक्कम लोखंडे याला ऑनलाइन पद्धतीने देवू केली असता लोखंडे याने नकार दिला.

ऑनलाइन पद्धतीने दिली तर १८ टक्के जीएसटी भरावा लागतो, तुम्ही रोख स्वरुपातच रक्कम द्या अशी मागणी केली. त्यानुसार जुलै २०२४ मध्ये या दोघांनी १ कोटी ५० लाख रुपये त्याला दिले. यावेळी अजयसह अक्षय मोहन खुरंगे (रा. राजुरी, ता. फलटण, जि. सातारा), गणेश रमेश मोरे (रा. मोरेमळा, गुरसाळे, ता. माळशिरस, जि. सोलापूर), उज्ज्वला आनंद जगताप (रा. जवळार्जून, ता. पुरंदर) हे लोक हजर होते.


पैसे गुंतवल्यानंतरही या दोघांना इन्स्टेव्हीची रक्कम मिळाली नाही. बँक खात्यावर रक्कम जमा होईल असे सांगितले, पण तेथेही झाली नाही. त्यामुळे या दोघांना शंका आली. आम्हाला इन्सेन्टीव्ह नको आमचीच रक्कम परत करा, अशी मागणी त्यांनी केली. परंतु लोखंडे याने माझ्यावर विश्वास नसेल तर तुम्हाला हर्ष आयकॉन एमआयडीसी बारामती येथील मालमत्ता करारनामा करून लिहून देतो, असे सांगितले. १५ ऑक्टोबर रोजी लोखंडे याने एमआयडीसीतील फ्लॅट नं. २६ हा ४१.२७ चौरस मीटर व फ्लॅट क्रमांक २७ ची ५६.६३ चौरस मीटरचा फ्लॅट करारपत्र करून ओमासे यांना दिला. तीन महिन्याचा कालावधी त्यात नमूद करण्यात आला. त्यानंतर या दोघांनी पैसे मागितले असता ३ लाख ७ हजार रुपये एप्रिल २०२५ मध्ये देण्यात आले. त्यापैकी ५० हजार रुपये फिर्यादीला मिळाले.

दि. १४ मे रोजी लोखंडे याने स्वतःच्या घराजवळ पैसे देतो असे सांगून या दोघांना बोलावून घेतले. यावेळी खुरंगे हे देखील सोबत होते. त्यावेळी लोखंडे याने रक्कम घेवून येतो असे सांगत बाहेर येत अंगावर धावून येत हाताने, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. खुरंगे याने लोखंडे याला समजवण्याचा प्रयत्न केला असता लोखंडे याने फिर्यादीला जातीवाचक शिविगाळ केली. तू आता पैसे विसरून जा. पुन्हा पैशाचा विषय काढला तर तुला जीवंत सोडणार नाही, मी आत्तापर्यंत लोकांना ५०० कोटींचा चुना लावला आहे. असे म्हणत फिर्यादीच्या हातातील अंगठी जबरदस्तीने हिसकावून घेतली. फिर्यादीने ११२ क्रमांकाला फोन करत पोलिसांना हा प्रकार कळवला.

# आंबेगाव तालुक्यात मुसळधार पावसाचा कहर; घरात व उभ्या पिकात पाणी, शेतीला तळ्याचे स्वरुप

**मंचर । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यात पिंपळगाव तर्फे महाळुंगे, पारगाव तर्फे खेड व पेठ येथे शुक्रवारी (ता.१६) दुपारी विजेच्या कडकडासह जोरदार पाऊस झाला. येथे रस्त्यावरून पाणी वाहत होते. ओढ्यानाल्यांना पूर आला आहे. अनेक तलाव पाण्याने तुडुंब भरले आहेत. पिंपळगाव तर्फे महाळुंगे येथे अनेक घरात व पिकात पुराचे पाणी शिरले आहे. शेतांना तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.



सकाळपासून हवेत प्रचंड उकाडा जाणवत होता. दुपारी जोरदार पावसाला सुरुवात झाली. विजा कोसळत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. लग्नानिमित्त अनेक कुटुंबात सत्यनारायणाच्या पूजेचे कार्यक्रम होते.

पावसामुळे कुटुंबीय व नातेवाईकांची धावपळ झाली. रस्त्यावरून पाणी वाहत असल्याने व ओढ्या-नाल्यांना पूर आल्याने काही वेळ जनजीवन व वाहतूक विस्कळीत झाली होती. पावसाने उघडीप दिल्यानंतर सत्यनारायणाच्या पूजेचे व भोजनाचे कार्यक्रम सुरु झाले.

'पिंपळगाव तर्फे महाळुंगे येथून अवसरी खुर्द गावाकडे जाणारा (अमराई मार्ग) डांबरी रस्ता वाहून गेला आहे. १०० हून अधिक शेतजमिनीत असलेल्या उभ्या पिकात व ३० हून अधिक घरांमध्ये पाणी शिरल्याने लहान मुले व वृद्धांचे अतोनात हाल झाले.'

अशी माहिती युवासेनेचे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य सचिन बांगर यांनी दिली. याभागाती नुकसानीचे पंचनामे महसूल खात्याने करावी अशी मागणी त्यांनी आंबेगाव तालुक्याचे तहसीलदार संजय नागटिळक यांच्याकडे केली आहे. दरम्यान अनेक ठिकाणी वीज वाहिन्या तुटल्याने वीज पुरवठा खंडित झाला होता. वीज पुरवठा पूर्ववत सुरु होण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांच्या धावपळ सुरु होती.

cmyk